दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-११६ | गुरूवार दि.१६ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महागाईचा भडका; जबाबदारी कोणाची?

देशातील किरकोळ महागाईचा दर जून महिन्यात ४.३८ टक्क्यांवर पोहोचला आणि तब्बल १७ महिन्यांनंतर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्क्यांच्या लक्ष्यरेषेचा भंग झाला. ही केवळ आकडेवारीतील वाढ नाही, तर सामान्य नागरिकांच्या खिशावर पडणाऱ्या वाढत्या ओझ्याची धोक्याची घंटा आहे. महागाई नियंत्रणात असल्याचा दावा करणाऱ्या सरकारसमोर आता वास्तवाचे कठोर चित्र उभे राहिले आहे.

## थोडक्यात...

### एमपीएससी ऑनलाईन पद्धतीला तूर्तास स्थगिती

पुणेः महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्या परीक्षा पद्धतीसंदर्भात विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यातील स्पर्धा परीक्षार्थींच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली. यामध्ये सद्यःस्थितीत ऑनलाइन परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांवर लादली जाणार नाही, तसेच भविष्यात ऑनलाइन परीक्षा घेण्याचा विचार झाला तर सर्व स्पर्धा परीक्षा एकाच वेळी त्या पद्धतीने घेता येईल, अशी सक्षम व विश्वासार्ह यंत्रणा उभारल्यानंतरच त्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन फडणवीस यांनी शिष्टमंडळाला दिले. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर पुण्यातील स्पर्धा परीक्षार्थींनी आंदोलन करण्याचा निर्णय मागे घेतल्याचे स्पष्ट केले. स्पर्धा परीक्षार्थींनी दिलेल्या माहितीनुसार, फडणवीस यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर १७ जुलैपर्यंत सुरू असलेल्या संयुक्त पूर्व परीक्षा (गट क) अर्ज प्रक्रियेबाबतही पुनर्विचार केला जाईल. तसेच, विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन सद्यःस्थितीत ऑनलाइन परीक्षेचा निर्णय स्थगित करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले आहे.

### लालूप्रसाद यादव यांचा जामीन कायम

नवी दिल्लीः झारखंड उच्च न्यायालयाने बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांना चारा घोटाळा प्रकरणात मंजूर केलेल्या जामिनाविरुद्ध केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) दाखल केलेले अपील सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावले. उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणार नसल्याचे न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. मात्र, यादव आणि सीबीआय यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध दाखल केलेल्या मुख्य अपिलांवरील सुनावणीला गती द्यावी, असे निर्देश उच्च न्यायालयाला दिले. या प्रकरणाची सुनावणी ६ महिन्यांच्या आत पूर्ण करावी, असे खंडपीठाने उच्च न्यायालयाला सांगितले. हे प्रकरण १९९१ ते १९९४ या कालावधीत देवघर कोषागारातून ८९ लाख रुपयांच्या गैरव्यवहाराशी संबंधित होते. हा घोटाळा झाला तेव्हा लालूप्रसाद बिहारचे मुख्यमंत्री होते.

### कृष्ण-मराठवाडा सिंचन योजना राष्ट्रीय प्रकल्प घोषित करा-खा.निंबाळकर

दिल्लीः दुष्काळ रोखण्याच्या उद्देशाने आखण्यात आलेल्या कृष्ण-मराठवाडा उपसा सिंचन योजनेला (लिफ्ट इरिगेशन स्कीम) राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी बुधवारी केली. ओमराजे निंबाळकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन आपल्या मतदारसंघाशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा केली, असे त्यांनी सांगितले. कृष्ण-मराठवाडा सिंचन प्रकल्पाला राष्ट्रीय महत्त्वाचा दर्जा मिळावा, ही माझी मुख्य मागणी होती. यामुळे केंद्राकडून निधी उपलब्ध होईल आणि कामाला गती मिळेल. आपल्या मतदारसंघासाठी केंद्रीय विद्यालय स्थापन करण्यासह इतर मागण्याही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी या मुद्द्यांवर चर्चा केली आणि आगामी संसदेच्या अधिवेशनात यावर विचार केला जाऊ शकतो, असे सांगितले, असे राजेनिंबाळकर म्हणाले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५जुलै २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४६.५० क्विंटल | २,५३० | २,९०० | २,६९१ |
| ज्वारी/हायब्रिड: १३५.५० क्विंटल | २,१५१ | ४,३९१ | २,९४१ |
| मका/लोकल: ३९.५० क्विंटल | २,००० | २,२४९ | २,१२४ |
| तूर : ३.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९७.५० क्विंटल | २,२०० | ३,३०० | २,६७७ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ११.०० क्विंटल | ४,८०१ | ५,७८१ | ५,४२६ |

# शेतकऱ्यांची ४८ हजार कोटींची वीजबील थकबाकी माफ

## कृतज्ञता सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीजबिल आकारले जात नाही. मात्र, त्यांची वीज वापराची ४८ हजार कोटींची जुनी थकबाकीही आता माफ केली जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईत सत्कार सोहळ्यात बोलताना जाहीर केले.**

तुतारींच्या गजरात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेकडो शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेचे उत्स्फूर्त स्वागत केले. शेतकऱ्यांची पाटी कोरी व्हावी आणि या पाटीवर त्याला नवा इतिहास लिहिता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात येत आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्याबद्दल भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाने राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. या सत्कार सोहळयाला उत्तर देताना मख्यमंत्री




देवेंद्र फडणवीस यांनी कृषी क्षेत्राच्या परिवर्तनाचा व्यापक आराखडा राज्यासमोर सादर केला. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले

**पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्याचा शेतीखर्च कमी व्हावा यासाठी दरवर्षी २५ हजार कोटींची वीजबिलमाफी दिली जात असल्याने राज्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वीज मिळू लागली आहे. सौरपंप आणि सौर कृषी वाहिनी योजनांमुळे ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळू लागली असून वर्ष अखेरीपर्यंत शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जाईल, अशी ग्वाहीही दिली.**

की, आज कर्जमाफीव्यतिरिक्त शेतकऱ्यास ९५ हजार कोटींचे साह्य दिले जात असून शेतीक्षेत्र सक्षम आणि शाश्वत व्हावे यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार हातात हात घालून प्रयत्न करत आहे, अशी ग्वाही देत पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मात्र, कर्जमाफी हा अंतिम उपाय नाही. शेतकऱ्यांना सातत्याने कर्जमाफी द्यावी लागत असेल, तर शेतीची ▶▶ पान २ वर

# सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला सात मोठ्या कलाकारांचा पाठिंबा



दिल्ली । वृत्तसंस्था

शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या बेमुदत उपोषणाचा बुधवारी (दि. १५ जुलै) १८ वा दिवस असल्याने त्यांची प्रकृती खालावू लागली आहे. सोनम वांगचुक यांच्या खालावत्या प्रकृतीबाबत अनेक सेलिब्रिटींनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. शबाना आझमी, झीनत अमान, ओमी वैद्य, अनुराग कश्यप, दिया मिर्झा, अभय देओल आणि अतुल कुलकर्णी यांनी वांगचुक ▶▶ पान २ वर

### तर दोन दिवसांत मृत्यू होऊ शकतो ?

दिल्ली : शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याने त्यांना तातडीने सरकारी रुग्णालयात दाखल करून आवश्यक असल्यास वैद्यकीय देखरेखीखाली आहार द्यावा, अशी मागणी करणारी जनहित याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. ही याचिका सामाजिक कार्यकर्ते आणि वकील राकेश कुमार सैनी यांनी दाखल केली आहे. याचिकेनुसार, उपोषण सुरू झाल्यापासून वांगचुक यांचे वजन सुमारे ८.५ किलो घटले असून त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. उपोषण असेच सुरू राहिल्यास पुढील दोन दिवसांत वांगचुक यांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. असे म्हटले आहे.

# अजित पवारांच्या जयंतीचा समावेश राष्ट्रपुरुष आणि थोर पुरुषांच्या यादीत

## दादांची जयंती शासकीय कार्यालय, शाळा-महाविद्यालयात साजरी होणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत नेते अजित पवारांची जयंती आता सर्व शासकीय कार्यालयात साजरी होणार आहे. राज्य सरकारने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीचा समावेश आता शासकीय स्तरावरील अधिकृत राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंती कार्यक्रमांच्या यादीत करण्यात आला आहे. सामान्य



प्रशासन विभागाने १५ जुलै, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते हसन मुश्रीफ आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांकडे तशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून, दादांच्या महाराष्ट्राच्या विकासातील अभूतपूर्व योगदानाचा हा मोठा सन्मान मानला जात आहे. स्व.अजितदादा पवार यांची पहिली ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रातील ६४ नगरसेवक अपात्र

## निवडणूक आयोगाची मोठी कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाचा हिशोब वेळेत सादर न करणाऱ्या उमेदवारांविरोधात मोठी कारवाई केली आहे. पुणे विभागातील आणखी २४ उमेदवारांना पुढील तीन वर्षांसाठी अपात्र घोषित करण्यात आले असून, यासह अशा कारवाईतील उमेदवारांची संख्या ६४ वर पोहोचली आहे.**

पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ही कारवाई केली. संबंधित उमेदवारांना १३ जुलै २०२६ रोजी सुनावणीदरम्यान आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. मात्र, समाधानकारक खुलासा न केल्याने त्यांना अपात्र घोषित करण्यात आले. चाकण नगरपरिषदेचे १० उमेदवार, फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेचे १३ उमेदवार. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचा १ उमेदवारावर कारवाई केली आहे. संबंधित उमेदवारांनी निवडणुकीनंतर ३० दिवसांच्या विहित मुदतीत निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही. ▶▶ पान २ वर

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळीसह घेतला बीड जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदीर आणि परिसर विकास आराखडा आणि जिल्ह्यातील विविध विषयक कामकाजाचा सर्वंकष आढावा राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी बुधवारी बैठकीत घेतला व विविध प्रकरणे अधिकाऱ्यांना निर्देश देत काही विकासकामांबाबत मार्गदर्शनही दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात ही बैठक पार पडली. यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पर्यावरण मंत्री या नात्याने जिल्ह्यात एकल प्लास्टिकचा उपयोग रोखण्याबाबतच्या जागरण मोहिमेचे त्यांनी प्रतिकात्मक उद्घाटन केले. एकल प्लास्टिक वापर रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी शाळकरी मुलांचा सहभाग उपयोगाचा ▶▶ पान २ वर

# ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बालगृहे उभारा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ऊसतोड कामगार स्थलांतरित होत असताना त्यांच्या मुलांना संबंधित जिल्ह्यांतील बालगृहांमध्ये तात्पुरता निवारा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. राज्यातील बालगृहांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात



आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालगृह उपलब्ध करून दिल्यास स्थलांतराच्या काळात मुलांचे, विशेषतः ▶▶ पान २ वर

# मोहम्मद अली जौहर विद्यापीठावर बुलडोझर चालणार




## ४० पैकी ३८ इमारती जमीनदोस्त होणार, योगी आदित्यनाथ सरकारचा आदेश

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारची गुन्हेगार आणि बेकायदेशीर बांधकामांविरोधातील झिरो टॉलरन्स मोहीम आणखी तीव्र झाली आहे. समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि रामपूरचे माजी खासदार आझम खान यांच्या मौलाना मोहम्मद अली जौहर युनिव्हर्सिटीला प्रशासनाने अत्यंत मोठा धक्का दिला आहे. युनिव्हर्सिटीच्या आवारातील ▶▶ पान २ वर

# तहसीलदार सहीसलामत, राजकीय पाठबळाची चर्चा

## गेवराईतील ९० कोटींचा वाळू घोटाळा

फोकस...

बीड । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यात गाजलेल्या ९० कोटी रुपयांच्या वाळू घोटाळ्याचे प्रकरण पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. शासनाच्या घरकुलधारकांना मोफत मिळणाऱ्या वाळूची चोरी करून मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप तहसीलदार खोमणे यांच्यावर करण्यात आला होता.**

**या प्रकरणी स्थानिक आमदारांनी स्पॉट पंचनामा करून आवाज उठवला होता, मात्र पावसाळी अधिवेशन संपल्यानंतरही कोणतीही कारवाई न झाल्याने, "आमदारापेक्षाही तहसीलदार वरचढ ठरले का?" अशी चर्चा आता बीड जिल्ह्यात रंगली आहे.**

गोदावरी पात्रातून घरकुलधारकांसाठी शासनाने पाच ब्रास वाळू मोफत देण्याची योजना जाहीर केली होती. मात्र, या वाळूची परस्पर विल्हेवाट लावून सुमारे ९० कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप तहसीलदार खोमणे यांच्यावर करण्यात आला. या गंभीर प्रकाराची दखल घेत गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन स्पॉट पंचनामा केला होता आणि अधिवेशनात हा विषय लावून धरण्याचा इशारा दिला होता. पावसाळी



अधिवेशनाच्या काळात या घोटाळ्याची मोठी चर्चा होईल, अशी अपेक्षा होती. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा विषय सभागृहात उपस्थित करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यानंतर या प्रकरणात कोणतीही ठोस हालचाल झाली नाही. अधिवेशन संपले तरीही संबंधित अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने, तक्रारदारांच्या तक्रारींना वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या आहेत ▶▶ पान २ वर

### भर अब्दुल्ला गुड थैली मे

या सर्व घटनाक्रमानंतर स्थानिक पातळीवर "भर अब्दुल्ला गुड थैली मे" ही म्हण चर्चेत आली आहे. तहसीलदार खोमणे हे एका बड्या मंत्र्याचे नातेवाईक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात असल्याने, त्यांच्या वरदहस्तामुळेच ही कारवाई टाळली जात असल्याचे बोलले जात आहे. तक्रारदार आणि आमदारांचे प्रयत्न निष्फळ ठरल्याने प्रशासकीय व राजकीय पातळीवर तहसीलदार यांचे पारडे जड ठरल्याचे चित्र सध्या दिसत आहे. आता या प्रकरणी शासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांचे टेन्शन मिटले!

## ई- पीक पाहणीसाठी सहायकांची नियुक्ती

पुणे । प्रतिनिधी

शेतामध्ये इंटरनेट नेटवर्कची समस्या आणि तांत्रिक कारणांमुळे शेतकऱ्यांना स्वतः ई- पीक पाहणी ॲपद्वारे शेतातील पिकांची नोंद करताना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारच्या डिजीटल क्रॉप सर्व्हे या प्रणालीच्या अनुषंगाने पीक पाहणी प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला आहे. आता हंगामाच्या पहिल्या दिवसापासूनच पीक पाहणी सहायकांमार्फत करण्यात येईल. त्यासाठी कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका, कॉमन सर्व्हिस सेंटर चालक यांची सहायक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय महसूल विभागाकडून जारी करण्यात आला आहे.

केंद्र सरकारने डिजीटल ॲग्रीकल्चर मिशन अंतर्गत ॲग्रीस्टॅकचा भाग म्हणून डिजीटल क्रॉप सर्व्हे ही देशव्यापी एकसमान पीक पाहणी प्रणाली विकसित केली आहे. तसेच सर्व राज्यांमध्ये एकसमान तांत्रिक मानके ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# महागाईचा भडका; जबाबदारी कोणाची?

देशातील किरकोळ महागाईचा दर जून महिन्यात ४.३८ टक्क्यांवर पोहोचला आणि तब्बल १७ महिन्यांनंतर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्क्यांच्या लक्ष्यरेषेचा भंग झाला. ही केवळ आकडेवारीतील वाढ नाही, तर सामान्य नागरिकांच्या खिशावर पडणाऱ्या वाढत्या ओझ्याची धोक्याची घंटा आहे. महागाई नियंत्रणात असल्याचा दावा करणाऱ्या सरकारसमोर आता वास्तवाचे कठोर चित्र उभे राहिले आहे.

महागाई वाढण्यामागे आंतरराष्ट्रीय कारणे असल्याचे सांगून सरकार आपली जबाबदारी झटकू शकत नाही. अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या, हे खरे असले तरी त्याचा फटका नागरिकांना किती बसू द्यायचा, हे सरकारच्या आर्थिक धोरणांवर अवलंबून असते. भारताची तेल आयातीवरील मोठी निर्भरता लक्षात घेता इंधनावरील कररचनेचा फेरविचार, पुरवठा व्यवस्थेची कार्यक्षमता आणि बाजार नियंत्रण याबाबत ठोस पावले अपेक्षित होती. दुर्दैवाने ती वेळेवर उचलली गेली नाहीत. इंधन महागले की त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक घटकावर होतो. वाहतूक खर्च वाढतो, शेती उत्पादन महागते, उद्योगांचा खर्च वाढतो आणि अखेरीस प्रत्येक वस्तूची किंमत सामान्य ग्राहकाला अधिक मोजावी लागते. टोमॅटो, आले, भाजीपाला, दूध, धान्य अशा जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींनी सर्वसामान्यांचे घरगुती अर्थकारण विस्कळीत केले आहे. महागाईचे सर्वाधिक चटके मध्यमवर्गीय, नोकरदार, निवृत्त नागरिक आणि गरीब कुटुंबांना बसत आहेत. यातच यंदा 'एल निनो'चा धोका आणि पावसाची अनिश्चितता ही चिंतेची बाब आहे. शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असताना कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक दीर्घकालीन उपाययोजनांकडे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. प्रत्येक वर्षी पाऊस कमी झाला की अन्नधान्याच्या किमती वाढतात आणि सरकार तात्पुरत्या उपाययोजनांवर भर देते. ही सवय बदलल्याशिवाय महागाईवर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवणे कठीण आहे. महागाईचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे आर्थिक वाढीवरील दबाव. महागाई वाढल्याने रिझर्व्ह बँकेला व्याजदर कमी करण्याची संधी मर्यादित होते. परिणामी गृहकर्ज, वाहनकर्ज आणि उद्योगांसाठीचे कर्ज महागच राहते. गुंतवणूक कमी होते, उद्योग विस्ताराला ब्रेक लागतो आणि रोजगारनिर्मितीवरही त्याचा परिणाम होतो. म्हणजेच महागाईचा फटका केवळ स्वयंपाकघरापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण अर्थचक्रावर होतो. सरकारने केवळ महागाईची कारणे सांगून थांबून चालणार नाही. इंधनावरील करांचा पुनर्विचार, अन्नधान्य पुरवठा साखळी मजबूत करणे, साठेबाजांविरुद्ध कठोर कारवाई, कृषी क्षेत्राला बळकटी आणि बाजारातील कृत्रिम टंचाई रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर रिझर्व्ह बँकेनेही महागाई नियंत्रण आणि आर्थिक वाढ यांच्यात संतुलन राखणारे धोरण अवलंबणे आवश्यक आहे. महागाई ही कोणत्याही सरकारच्या आर्थिक व्यवस्थापनाची खरी परीक्षा असते. कारण तिचा परिणाम थेट प्रत्येक नागरिकाच्या जगण्यावर होतो. आज वाढत्या महागाईमुळे सामान्य माणसाचे बजेट कोलमडत आहे, बचत कमी होत आहे आणि भविष्याविषयीची असुरक्षितता वाढत आहे. त्यामुळे ही केवळ आर्थिक समस्या नसून सामाजिक आणि राजकीय आव्हानही आहे. सरकारने वेळेत प्रभावी उपाययोजना केल्या तर परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते; अन्यथा महागाईचा हा भडका देशाच्या विकासालाच ग्रहण लावू शकतो.

# एन.ए.नसतानाही प्लॉट विक्री

## कारवाई न झाल्यास २२ जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मौजे इंदेवाडी येथे बिनशेती (एन.ए.) परवानगी नसतानाही कथितरित्या प्लॉट विक्री करून कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करत राहुल भास्कर साने यांनी संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अन्यथा २२ जुलै २०२६ पासून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.ङ्कङ्कसाने यांनी दिलेल्या निवेदनानुसार, गट क्रमांक ८२ मधील लक्ष्मीनगर, साईनगर, शिवशंकर नगर, संभाजीराजे नगर, शिवाजीराजे नगर तसेच गट क्रमांक ९६ मधील गोकुळ नगर या नावाने प्लॉटिंग योजना राबविण्यात आली. मात्र, या जमिनींना एन.ए. परवानगी नसतानाही प्लॉट विक्री करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात संबंधित जमीनमालक शेख मुश्ताक शेख आमीर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून सर्व बेकायदेशीर प्लॉट विक्री रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यापूर्वी ३ जून व १२ जून २०२६ रोजीही निवेदने देऊनही प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्याचा आरोप साने यांनी केला आहे. त्यामुळे न्याय मिळावा व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी आमरण उपोषणाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# मतदार यादीतील मॅपिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बीएलओंचा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव

**जालना । प्रतिनिधी**

**भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण अभियानांतर्गत सन २००२ पूर्वीच्या मतदार यादीतील मतदारांची नावे सध्याच्या मतदार यादीशी मॅपिंग करण्याचे काम पूर्ण झाले असून, जालना जिल्ह्याने या अभियानात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या उत्कृष्ट कार्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व त्यांच्या पथकांचा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.**




भारत निवडणूक आयोगाने १४ मे २०२६ रोजी जाहीर केलेल्या तिसऱ्या टप्प्यातील विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमानुसार महाराष्ट्रासह १६ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरभेटी देऊन मतदारांना गणना प्रपत्र वाटप, अर्ज भरण्यास सहाय्य व डिजिटायझेशनची प्रक्रिया राबवत आहेत. जालना जिल्ह्यात १६ लाख ८२ हजार ७२३ मतदार असून आतापर्यंत १३ लाख ५४ हजार ९२४ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून त्याची टक्केवारी ८०.५२ आहे. यामध्ये ९९-परतूर मतदार संघात ३ लाख ३० हजार ३७७ मतदारापैकी २ लाख ८७ हजार ३१० मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ८६.९६ आहे. १००-घनसांगवी मतदारसंघात ३ लाख २८ हजार ६०६ मतदारापैकी २ लाख ९९ हजार ५३५ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ९१.१५ आहे. १०१-जालना विधानसभा मतदारसंघात ३ लाख ५८ हजार ६३७ मतदारापैकी २ लाख ३ हजार ३९८ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ५६.७१ आहे. १०२-बदनापूर मतदारसंघात ३ लाख ३८ हजार ९३६ मतदारापैकी २ लाख ८६ हजार ४०९ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ८४.५० आहे. १०३-भोकरदन मतदारसंघात ३ लाख २६ हजार १६७ मतदारापैकी २ लाख ७८ हजार २७२ मतदाराची मॅपींग पूर्ण झाली असून त्याची टक्केवारी ८५.३२ आहे. अभियानाच्या अनुषंगाने १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता दिनांक निश्चित करण्यात आला असून, ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील, तर अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदार मॅपिंगचे काम प्रभावीपणे पूर्ण करणाऱ्या बीएलओंचा आज सत्कार करण्यात आला. या अभियानात परतूर, घनसावंगी, जालना, बदनापूर आणि भोकरदन विधानसभा मतदारसंघातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बीएलओंना गौरविण्यात आले. या सत्कारमूर्तींमध्ये शरद मुंढे, सुनिल गवई, श्रीमती कालिंदा दवंडे, श्रीराम बहीर, मुकेश गाडेकर, बी. आर. वाघमारे, रमेश मान्टे, श्रीमती शिवगंगा बारगाजे, दिपक मोहिते, शिवाजी ठाकूर, ए. पी. इंगळे या बीएलओंचा समावेश आहे. मतदार यादी अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने विशेष सखोल पुनरीक्षण अभियान अत्यंत महत्त्वाचे असून, नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना दौरा

**जालना । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे शनिवार, दि. १८ जुलै, २०२६ रोजी दुपारी १.५० वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. दुपारी २.०० वाजता जालना जिल्हा वार्षिक नियोजन समिती व विविध शासकीय आढावा बैठकीस उपस्थिती. स्थळ जिल्हाधिकारी कार्यालय, जालना सायंकाळी ५.१५ वाजता छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी तर्फे वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य व औषधोपचार शिबिर!








**माजलगाव । प्रतिनिधी**

**आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेसाठी मंगलनाथ मंदिर माजलगाव येथे जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आदरणीय सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ''सेवा हाच धर्म'' या ब्रीदाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात तज्ञ फिजिओथेरपिस्ट व विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, पायांची तपासणी, रक्तदाब तपासणी केली. तसेच वारीदरम्यान होणाऱ्या पायांच्या वेदना, सूज, गोठे, स्नायूंचा थकवा आणि कमकुवतपणा व्यवस्थापन, वेदना व्यवस्थापन, शोफ कमी करणे यावर मोफत औषधोपचार व मार्गदर्शन देण्यात आले. ''वारकऱ्यांसाठी योग्य पाऊल निगा'' या विषयावर विशेष मार्गदर्शन करण्यात आले: १. रोजची पाऊल स्वच्छता आणि तपासणी २. मधुमेही रुग्णांसाठी विशेष काळजी ३. योग्य पादत्राणांची निवड ४. पायांचे व्यायाम आणि विश्रांतीचे महत्व ५. चालणाऱ्यांसाठी आरोग्य शिक्षण यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पॉलराज म्हणाले, ''वारीदरम्यान पायांची काळजी घेणे म्हणजेच खरी विठ्ठलसेवा आहे. जिजामाता कॉलेज नेहमीच समाजसेवेसाठी तत्पर आहे.''

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांची ४८ हजार कोटींची

अवस्था कठीण आहे, असा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. त्यामुळे शेती फायद्याची व्हावी यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्याखेरीज पर्याय नाही. शेतीच्या क्षेत्रात नव्या पद्धती, नवे तंत्रज्ञान आणणे ही गरज आहे. त्यासाठी गुंतवणूक ही अडचण असल्याचे ओळखून २०१४ नंतर शेती क्षेत्रात गुंतवणूक करण्याचा निर्णय सरकारने घेतला. मागेल त्याला शेततळे योजनेतून राज्यातील लाखो शेतकऱ्यांना नव्या संधी दिसल्या, त्याची फळे आता दिसू लागली आहेत. जलयुक्त शिवारमुळे आता शेतकरी तीन तीन पिके घेऊ लागला आहे. शेतमालाला आता जागतिक बाजारपेठ उपलब्ध आहे. त्याचा फायदा घ्यायचा असेल तर उत्पादकता वाढवून उत्पादन खर्च कमी करावा लागेल, त्यामुळे गटशेतीच्या योजनेतून शेतकऱ्यांना त्याचा फायदा घेता येईल. पुढच्या काळात शेतकऱ्यांचे गट तयार केले तर शेतकऱ्यांना पूरक पिके घेता येतील, आणि शेती हा उद्योग फायद्यात आणता येईल, असा विश्वासही व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, कोणतीही निवडणूक समोर नसताना सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची ग्वाही आम्ही निवडणुकीच्या काळात दिली होती. त्यानंतर झालेल्या सर्व निवडणुकांत भाजपा महायुतीला महाराष्ट्राने अभूतपूर्व जनादेश दिला. कर्जमाफी किंवा शेतकऱ्यांच्या हिताचे कोणतेही निर्णय घेताना राजकारण केले जाणार नाही, तर केवळ शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करूनच घेतला जाईल. शेतकऱ्यांच्या नावावर आंदोलने आणि दुकानदारी करणाऱ्यांना सरकारची ही भावना कळलीच नाही, असा टोलादेखील मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना उद्देशून मारला.

---------

### अजित पवारांच्या जयंतीचा समावेश

जयंती २२ जुलै रोजी राज्यभर शासकीय स्तरावर साजरी केली जाणार आहे. २२ जुलै या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना शासकीय मानवंदना दिली जाईल. हा आदेश राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांनाही बंधनकारक करण्यात आला आहे. तेथेही दादांच्या जीवनप्रवासावर आधारित विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. अजितदादांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि जलसंपदामंत्री यांसारखी अनेक महत्त्वाची पदे सांभाळली. त्यांची कामाची शिस्त, प्रशासनावरील करडी पकड, पहाटेपासून कामाला सुरुवात करण्याची अनोखी पद्धत आणि शब्द पाळणारा नेता ही त्यांची ख्याती अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांच्या निधनानंतर (२८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातानंतर) संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आता त्यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय म्हणजे दादांच्या लोकसेवेच्या वारशाचा आणि नवा महाराष्ट्र घडवण्याच्या त्यांच्या ध्येयाचा शासकीय स्तरावर केलेला सर्वात मोठा सन्मान आहे.

----------

### सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला

यांना पाठिंबा दर्शवला आहे. तसेच त्यांनी उपोषण मागे घेण्याचेही आवाहन केले आहे. सोनम वांगचुक हे २८ जूनपासून बेमुदत उपोषणावर आहेत. ते कॉकरोच जनता पार्टी आयोजित आंदोलनात सहभागी झाले. या आंदोलनात निट आणि इतर स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहारांप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. आंदोलनाच्या आयोजकांच्या म्हणण्यानुसार, उपोषणामुळे वांगचुक यांचे वजन सुमारे ८.५ किलोने घटले असून, त्यांच्या प्रकृतीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. सोनम वांगचुक यांच्या खालावत्या प्रकृतीबाबत अनेक सेलिब्रिटींनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. शबाना आझमी, झीनत अमान, ओमी वैद्य, अनुराग कश्यप, दिया मिर्झा, अभय देओल आणि अतुल कुलकर्णी यांनी त्यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. शबाना आझमी यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम हँडलवर सोनम वांगचुक यांचा उपोषणस्थळावरील व्हायरल फोटो शेअर केला. त्यांनी लिहिले आहे की, आपल्या देशाला तुमच्यासारख्या व्यक्तीची खूप गरज आहे. तुम्ही अन्यायाविरुद्ध आणि सत्याच्या बाजूने ठामपणे उभे राहता. आम्हाला सर्वांना तुमचा खूप अभिमान वाटतो. म्हणूनच आम्ही तुम्हाला विनंती करतो की तुम्ही तुमचे उपोषण मागे घ्यावे, कारण तुमचे मार्गदर्शन खरोखरच आमच्या विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढवते. हा लढा सुरूच राहिला पाहिजे आणि त्यासाठी तुमचे निरोगी राहणे अत्यंत आवश्यक आहे. आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत. अभिनेते अतुल कुलकर्णी यांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. एका पोस्टमध्ये त्यांनी तरुणांना ''प्रामाणिकपणा आणि करुणेच्या जोरावर या देशाला नव्याने घडवण्याचे'' आवाहन केले आहे. ''उद्याचा दिवस महत्त्वाचा आहे; मला तुमच्याकडून अपेक्षा आहेत,'' असेही त्यांनी म्हटले. अभय देओलने सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा व्हायरल झालेला फोटो आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला आणि त्यासोबत ब्रोकन हार्ट इमोजी जोडला. ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान यांनी वांगचुक यांना आपला पाठिंबा दर्शविला आहे. दिल्लीत सुरू असलेल्या त्यांच्या बेमुदत उपोषणाच्या पार्श्वभूमीवर, अमान यांनी सरकारला त्यांच्याशी संवाद साधण्याचे आवाहन केले आहे. ३ इडियट्समधील चतुर या भूमिकेमुळे घराघरात पोहोचलेला अभिनेता ओमी वैद्य याने सोनम वांगचुक यांना आपला पाठिंबा दर्शविला आहे. त्यांचे जीवन अमूल्य आहे, अशी पोस्ट करत बॉलिवूड अभिनेत्री दिया मिर्झाने सोनम वांगचुक यांना समर्थन दर्शविले आहे. बॉलिवूडमधील प्रयोगशील दिग्दर्शक अनुराग कश्यप यांनी वांगचुक यांना पाठिंबा दर्शविला आहे. कश्यप यांनी या कार्यकर्त्याची खालावलेली प्रकृती आणि त्याकडे प्रशासनाचे असलेले मौन व उघड उदासीनता यांवर टीका केली आहे.

------------

### ऊसतोड कामगारांच्या १

मुलींचे शिक्षण अखंडित राहिल आणि बालविवाहाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, ऊसतोड कामगारांना दिलासा मिळेल. परभणी, वाशिम, जालना, बीड आदी ऊसतोड कामगारांचे स्थलांतर अधिक असलेल्या जिल्ह्यांमध्ये या मुलांसाठी बालगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी. तसेच बंद असलेली बालगृहे, विशेषतः मुलींसाठी, पुन्हा सुरू करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देशही दिले. पुढे बोलताना आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यातील बालगृहांच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक तीन ते सहा महिन्यांनी एका महसुली विभागातील बालगृहांची तपासणी दुसऱ्या महसुली विभागातील अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी, असे निर्देशही दिले. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्याअंतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रित, विशेष काळजीची गरज असलेली एचआयव्ही/एड्स बाधित, संकटग्रस्त व अत्याचारग्रस्त बालकांना बालगृहांमध्ये दाखल करण्यात येत असल्याचे सांगितले.

----------

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळीसह

ठरेल असे त्यांनी यावेळी सांगितले. परळी येथील श्री क्षेत्र वैद्यनाथ मंदीर विकास आराखड्याचे फेर आखणी करण्यात आली. ३०१ कोटी रूपयांच्या या आराखड्यात पुर्ण परिसराच्या विकास करण्याबाबतच मेरू पर्वतावर ७५ फुटांचे महादेव शिल्प तसेच १२ ज्योर्तिलिंगाची माहिती देणारे म्युझियम तसेच लाईट- अँड साऊंड अर्थात लेझर शो यांचेही नियोजन असणार आहे. सध्या या ठिकाणी दरवषी ५० लाख भाविक भेट देतात. विकास आराखडा पुर्ण झाल्यानंतर या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होईल तसेच स्थानिक रोजगाराला देखील गती प्राप्त होणार आहे. याबाबतचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. आराखडा पुर्ण करण्यासाठी मंदिरालगतच्या ०९ एकर जागेचे भुमीसंपादन आवश्यक आहे. त्यामुळे मुळ आराखडा २८६ कोटींवरून आता ३०१ कोटी रूपयांपर्यंत वाढला आहे. नव्या आराखड्यानुसार पूर्व दिशेकडून भव्य असे प्रवेशद्वार त्यानंतर महानंदी मंदीर व पुढे मुख्य मंदीर राहणार असून परतीचा मार्ग उत्तर दिशेला असेल असे नियोजन आहे. याठिकाणी पार्किंग स्वतंत्र राहणार असून सर्व भाविकांची सर्व व्यवस्था विकसित करण्यात येणार आहे. यावेळी त्यांनी नगरपरिषद प्रशासन विभाग, पशुसंवर्धन विभाग, क्रिडा विभाग आदींचाही आढावा घेतला.

------------

### महाराष्ट्रातील ६४

यापूर्वी अशा ४० उमेदवारांवर कारवाई करण्यात आली होती. आता आणखी २४ उमेदवार अपात्र ठरल्याने एकूण अपात्र उमेदवारांची संख्या ६४ झाली आहे. अपात्र घोषित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

--------

### मोहम्मद अली जौहर विद्यापीठावर

तब्बल ३८ इमारती विनापरवाना आणि बेकायदेशीर असल्याचे सिद्ध झाल्याने रामपूर विकास प्राधिकरणाने या इमारती जमीनदोस्त करण्याचे कडक आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे आझम खान यांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे. रामपूरचे जिल्हाधिकारी आणि रामपूर विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष अजय कुमार द्विवेदी यांनी या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, ''जौहर युनिव्हर्सिटीच्या परिसरात एकूण ४० इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. मात्र, या संपूर्ण परिसराची कसून तपासणी आणि कागदपत्रांची पडताळणी केली असता, फक्त २ इमारतींचे नकाशे जिल्हा परिषदेकडून अधिकृतपणे मंजूर करण्यात आले होते. उर्वरित ३८ इमारती कोणत्याही प्रकारची मंजुरी न घेता बेकायदेशीरपणे उभारण्यात आल्या आहेत.'' युनिव्हर्सिटी प्रशासनाने दोन इमारतींचा नकाशा मंजूर करून घेतला होता, याचा अर्थ त्यांना कायद्याची आणि नियमांची पूर्ण माहिती होती. तरीही त्यांनी जाणूनबुजून इतर ३८ इमारतींच्या मंजुरीसाठी अर्ज केला नाही, असा प्रशासनाचा दावा आहे. या प्रकरणी रामपूर विकास प्राधिकरणाने युनिव्हर्सिटी प्रशासनाला कारणे दाखवा नोटीस बजावून लेखी स्पष्टीकरण मागवले होते. तसेच १५ जुलै रोजी प्रत्यक्ष हजर राहून बाजू मांडण्याची शेवटची संधीही दिली होती. युनिव्हर्सिटीच्या वतीने असे सांगण्यात आले की, ''ज्या सिंगनखेडा गावात ही युनिव्हर्सिटी बांधली गेली आहे, ते क्षेत्र आधी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येत होते आणि २०२४ मध्ये ते रामपूर विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत आले आहे. त्यामुळे आरडीएकडून परवानगी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.'' मात्र, जिल्हाधिकारी अजय कुमार द्विवेदी यांनी हा युक्तिवाद फेटाळून लावला.

---------

### गेवराईतील ९० कोटींचा

का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या वाळू घोटाळ्याची व्याप्ती फार मोठी होती. माध्यमाने यावर चांगलाच आवाज उठवला होता मात्र याचा काहीच उपयोग झाला नाही. जिल्हाधिकाऱ्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये तहसीलदारांची सुनावणी घेतली मात्र कारवाई अद्याप झाली नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी तसा शासनाकडे प्रस्ताव पाठवला मात्र त्याचाही काही या अधिवेशनात सूर दिसला नाही, केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यावर कारवाई करून वाळू घोटाळ्यावर पडदा पाडल्याची चर्चा आता जोर धरत आहे. यावरून असे दिसून येते की, सत्ताधारी आमदारांनाही कारवाई करता आली नाही. राजकीय पाठबळामुळेच तहसीलदार खोमणे यातून सही सलामत सुटले असावेत अशी चर्चा आहे.

----------------

### शेतकऱ्यांचे टेन्शन

व कार्यपद्धतीनुसार पीक पाहणी राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने राज्यातील ई-पीक पाहणी प्रणाली अधिक पारदर्शक व केंद्राच्या प्रणालीशी सुसंगत करण्यासाठी राज्यस्तरीय पीक पाहणी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाच्या डीसीएस एमएच मोबाईल ॲपची राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका तालुक्यातील १० गावाची अशा एकूण ३४० गावांची निवड करून प्रायोगिक तत्वावर चाचणी घेण्यात आली. त्याअंतर्गत पीक नोंदणी प्रक्रिया, प्रत्यक्ष क्षेत्रीय अंमलबजावणी, ग्राम महसूल अधिकारी स्तरावरील पडताळणी, माहितीची अचूकता, प्रणालीची कार्यक्षमता, डेटा गुणवत्ता, केंद्र शासनाच्या प्रणालीशी सुसंगतता तसेच राज्यातील विद्यमान महसूल अभिलेख प्रणालीशी एकात्मता यांचे सविस्तर परीक्षण करण्यात आले.

--------

**जा.क्र./न.प./अंबड/हस्तांतरण/२०२६**
**कार्यालय नगर परिषद अंबड**
**दिनांक :- १५/०७/२०२६**

**नांव बदलण्याचा**
**जाहीरनामा**

अर्जदार श्री/श्रीमतीः सतिष अण्णासाहेब होंडे

प्रकरणः प्लॉट नं १८-७५-२९ व १८-७५-३० चे वारस हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याव्दारे कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला.....येथे इमारतीचे / जागेचे नांव बदलून घेऊ इच्छितो ज्याची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसीमाः पुर्व :-प्लॉट नं.२६,३२ , पश्चिम :-कॉलनी अंतर्गत रस्ता, दक्षिण :- राजेंद्र देशमुख यांचा प्लॉट नं.२८, उत्तर :- मनोज शिगारे यांचा प्लॉट नं.३९

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद अंबड**

**टी.सी.हरवला आहे**

शिवराज अशोक तांबारे या नावाचा इ.१२ वी पासचा टी.सी (दाखला) बीड ते तागडगाव पाथर्डी बस प्रवासामध्ये हरवला आहे.ज्या कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**-::संपर्क::-**
**मो.९३२२२०४०११**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. १६ जुलै २०२६


## थोडक्यात

### गुरुकृपा ची सातत्यपूर्ण यशस्वी निकालाची परंपरा कायम

#### आयुर्वेद महाविद्यालयाचा ९४.३३% निकाल

माजलगाव ( प्रतिनिधी ) परमपूज्य गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, माजलगाव (जि. बीड) येथील प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. (बॅच २०२४-२५) चा निकाल ९४.३३ टक्के लागला असून महाविद्यालयाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.



या परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये कु. प्राजक्ता संतोष माने यांनी ७१ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. सायली बाळासाहेब मुंडे यांनी ६९.४१ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. तेजल नितीन घाडगे यांनी ६९.११ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.यशस्वी विद्यार्थिनींचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, वैद्यकीय संचालक, प्राचार्या व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



### नाथापूर येथील प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तक वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापूर या ठिकाणी असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये नव्याने प्रवेशित झालेल्या इयत्ता पहिलीपासून ते चौथी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेतील गणवेश व पाठ्यपुस्तकांचे गुरुवारी वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य देत होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करत त्यांच्या आयुष्याला शैक्षणिक आयाम देण्यासाठी सातत्याने कार्यरत असणाऱ्या नाथापूर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा मध्ये गुरुवारी सकाळी मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधीकारी सूर्यवंशी साहेब, सरपंच मयुरीताई सुंदरराव चव्हाण, उपसरपंच सतीश अश्रुबा शिंदे यांच्यासह शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नाथापूर या ठिकाणच्या पालकांनी उत्स्फूर्तपणे आपल्या पाल्यांना पहिल्याच दिवशी पूर्ण संख्येने उपस्थित ठेवून आपलाही या शैक्षणिक उपक्रमास भक्कम सहभाग आहे हे दर्शवून दिले. पुस्तक वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख तथा शाळेचे मुख्याध्यापक गोविंद सारडा सर,प्रमोद कुलकर्णी, रोहिणी कुलकर्णी, प्रतिभा कुलकर्णी इत्यादींनी परिश्रम घेतले. यावेळी अंकुश चव्हाण,कल्याण शेजुळ,दिलीप काळे,शेख चांद,बळीराम शिंदे ,कानडे सर,उत्तम गिलबिले ,रामनाथ गिराम ,शेख खुदबूदिन,नामदेव चव्हाण,अशोक कापसे,बंडू प्रधान,प्रकाश गिराम,मनोज लुचारे,अशोक गिराम,जिवन पवार,शेख करीम,महादेव शिंदे,अनिल कापसे,चंद्रकांत रडे,वसंत गसारडा गणेश मुंडे सिस्टर,डॉ.पाठक,धुमाळ सर, भानुदास काळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंतरजिल्हा दुचाकी चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश, २९ मोटारसायकल जप्त; १४.९० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह विविध जिल्ह्यांमध्ये दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन आरोपींच्या मुसक्या आवळत त्यांच्याकडून तब्बल २९ मोटारसायकली जप्त केल्या असून, यातील १५ गुन्हे उघडकीस आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या दुचाकींची एकूण किंमत १४ लाख ९० हजार रुपये इतकी आहे.

बीड जिल्ह्यात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि पोलीस उपाधीक्षक व्यंकटरामन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी



विशेष पथक तयार केले होते. दरम्यान, पोउपनि महेश विघ्ने यांचे पथक १४ जुलै २०२६ रोजी गेवराई उपविभागात पेट्रोलिंग करत असताना त्यांना एक संशयास्पद विना क्रमांकाची दुचाकी दिसली.

पथकाने गणेश सुदाम बहीर (रा. पांढरवाडी) यास थांबवून विचारपूस केली असता, त्याने ही दुचाकी चोरीची असल्याची कबुली दिली. तसेच, ही दुचाकी वैभव बाबासाहेब खेडकर (रा. माहीजळगाव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) याने चोरी केल्याचे सांगितले. गणेश बहीर याने इतर १४ चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी घेतल्या होत्या, ज्या पोलिसांनी जप्त केल्या.

पथकाने वैभव खेडकर याचा माहीजळगाव येथे जाऊन शोध घेतला व त्यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने बीड, अहिल्यानगर, पुणे शहर, पुणे ग्रामीण, सांगली आणि सोलापूर ग्रामीण येथून एकूण २९ मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. वैभव खेडकर हा एक सराईत गुन्हेगार असून, २०२२-२०२३ मध्ये जामखेड येथे त्याच्यावर मोटारसायकल चोरीचे ३० गुन्हे दाखल आहेत. या यशस्वी कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने आणि त्यांच्या पथकातील बप्पासाहेब घोडके, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते, भागवत शेलार, दिपक खांडेकर, विकी सुरवसे, युनुस बागवान आणि गणेश मराडे यांचा समावेश होता.

## शाळाबाह्य मुलांसाठी 'विशेष शोधमोहीम'

### ६ ते १८ वयोगटातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ६ ते १८ वर्ष वयोगटातील शाळाबाह्य, अनियमित तसेच स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दि.१५ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत विशेष शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने सदर नियोजन करण्यात आले आहे.

घरोघरी भेटी देण्याबरोबरच, बसस्थानके, रेल्वेस्थानके, वीटभट्ट्या, दगडखाणी, बाजारपेठा, कारखाने, स्थलांतरित कुटुंबे आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य मुलांचा शोध घेतला जाणार असल्याची माहिती, बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण यांनी दिली. जिल्ह्यात मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन यांसारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. जिल्ह्यात काही मुले शिक्षणापासून वंचित आहेत. अशा मुलांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करण्यात येणार आहे.

'या' ठिकाणी होणार कसून शोध

या मोहिम दरम्यान घरोघरी सर्वेक्षणासोबतच खालील भागांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

बसस्थानके, रेल्वेस्थानके, बाजारपेठा, कारखाने, वीटभट्ट्या, दगडखाणी, वाड्या, पाडे, तांडे, शेतमळे, जंगल परिसर, बालगृहे, निरीक्षणगृहे, विशेष दत्तक संस्था

गेल्या वर्षी जिल्ह्यात मुले १ ते १५ जुलै २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष शोध मोहीमेत जिल्ह्यात ०५ शाळाबाह्य मुले आढळून आली होती. शिक्षण विभागाच्या तत्परतेमुळे या सर्व मुलांना तातडीने शाळेत दाखल करून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश आले होते. जिह्यात शाळाबाह्य, अनियमित, व स्थलांतरित मुलांना शोधण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे व माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान ६ वरून...

### दूध उत्पादकतेसाठी

हा प्रथम व्यवसाय न समजता दुग्ध व्यवसाय हा प्रथम समजावा असे प्रतिपादन त्यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वच दूध उत्पादक हे भेसळ करत नसून काही निर्लज्ज भामटे दूध भेसळीची भडवेगिरी करत आहेत हे दूध व्यवसायासाठी अत्यंत धोकादायक असून अन्न व औषधी विभागाचे आयुक्त परी कारभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी या दूध भेसळीविरुद्ध कठोर कारवाई केली त्याबद्दल त्यांची कामगिरी अभिनंदन आहे असे त्यांनी शेवटी सांगितले संदीप सिंग यावेळी बोलताना म्हणाले की गाईंच्या आवश्यकतेनुसार त्यांना खाद्य पुरवावे शक्य द्यावे दहा दिवसाच्या अगोदरचे पशुखाद्य हे बुरशी आल्यामुळे मारक ठरू शकते अनेक पशुखाद्य कंपन्या या युरियाचा वापर करत आहेत त्यामुळे गाईंच्या आरोग्यासाठी धोका असल्यामुळे त्यापासून दूध उत्पादकांनी काळजी घेणे आवश्यक आहे आपण तयार करत असलेल्या कालवडी गाई यांचे पासून ०५ ते ०६ वेत मिळवायचे असून मुरघास हा चांगल्या पद्धतीने तयार केल्यास ९०% फायदा होतो दूध उत्पादकांनी सामूहिक पद्धतीने आपापले अनुभव शेअर करून एकमेकांना मदत केली पाहिजे सध्या बाजारात ३५ टक्के दूध हे नकली असल्यामुळे गंभीर परिस्थिती आहे २०,३० गाईंपासून चांगल्या पद्धतीने ब्रीडिंग फीडिंग आणि गोठ्याचे मॅनेजमेंट केल्यास जिल्हाधिकारी इतक्या पगाराचे आर्थिक नियोजन होऊ शकते त्यामुळे युवक शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे पाहावे केवळ पंजाबच नव्हे तर महाराष्ट्रात देखील दूध उत्पादनास चांगला वाव असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी बोलताना हरप्रीत सिंग म्हणाले की देशात दूध उत्पादनामध्ये स्पर्धा निर्माण झाली असून सहकारी संस्थांद्वारे डेरी फार्मिंग ही तामिळनाडू पंजाब महाराष्ट्र कर्नाटक आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू असून दूध व्यवसाय हा उत्तम अत्याधुनिक पद्धतीने केला पाहिजे पारंपारिक पद्धतीचे गोठे आता बंद केले पाहिजे व्ही टाईप गोठे तयार करून त्यातून उष्णता आणि वायू बाहेर पडला पाहिजे गोठ्याची स्वच्छता हा सर्वात मोठा घटक असून गाईचा खुराक हा अत्यंत शास्त्रज्ञ पद्धतीने दिला पाहिजे गाईच्या मर्जीनुसार खाद्य दिले पाहिजे गाईच्या लागवडीसाठी ब्रीडिंग फीडिंग आणि मॅनेजमेंट नुसार व्यवस्थापन केल्यास एका गाईपासून दहा महिन्यांमध्ये ४ लाख ७३ हजार रुपये किमतीचे दूध तयार होते हे आम्ही सिद्ध केले असून मुरघास स्टार्च हे पीठ तयार करून दिले पाहिजे तसेच गाय ही १२ तास बसून राहिली पाहिजे तिच्या रवंथ करण्यामुळे दूध उत्पादनात वाढ होत असून माणूस आपल्या गरजांची जशी पूर्तता करतो त्याच पद्धतीने गाईंचे गरजाची पूर्तता केल्यास गाईपासून आर्थिक उत्पन्न निर्माण करून आपली गरज भागवली जाते असे अनुभवास येत आहे असे सांगत ९० टक्के शेतकऱ्यांना दूध व्यवसायाचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास नसल्यामुळे थोड्या परिश्रमातून शास्त्रोक्त पद्धतीने आम्ही केलेल्या कामाचे व्हिडिओ पाहून शेतकऱ्यांनी दूध उत्पादन वाढवावे कारण दूध हा अत्यंत आवश्यक पदार्थ असून जगावर कितीही संकट आले तरी दूध हे मानवी जीवनातला सर्वात मोठा अन्नघटक आहे हे आपण कोविड-१९ काळात देखील अनुभवले आहे असे सांगत ते पुढे म्हणाले की संदीप सिंग आणि आपण शून्यातून दूध व्यवसाय निर्माण केला असून सन २०१६ मध्ये ०३ गाई त्याही प्रत्येकी १५ लिटरच्या असलेल्या अशा गाईंपासून व्यवसायाची सुरुवात केली आहे आज ४.०० कोटी रुपये चा व्यवहार होत आहे. महाराष्ट्र राज्य उत्पादनामध्ये दुसरा पंजाब होऊ शकतो असे त्यांनी शेवटी सांगितले.

### डोक्यात वीट मारून महिलेची

शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सुरुवातीला मारहाणीचा गुन्हा दाखल होता, मात्र महिलेच्या मृत्यूनंतर यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा वाढवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब फड करत आहेत. पोलिसांनी आरोपी सुभाष लष्करे याला अटक केली असून सध्या तो पोलीस कोठडीत आहे.

### जिजामाता कॉलेज ऑफ

या शिबिरात प्रमुख उपस्थिती:

डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले, सुभाष बप्पा सोळंके, भगवान शेजुळ , ज्ञानेश्वर जाधव, उपप्राचार्य डॉ.सिमुलिया डिन्जू , डॉ. हरिप्रिया, डॉ. सुमित आनंदगावकर, डॉ. वीरा, डॉ. प्रशांत राऊत, इरफान पठाण सर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकऱ्यांची सेवा केली. कार्यक्रमाची सांगता ''एक पाऊल विठ्ठलाकडे, एक पाऊल आरोग्याकडे'' या संदेशासह करण्यात आली.

### सरपंच आंधळेंनी दोन

घटनेच्या दिनांकपासून ते मदत यांच्या कुटुंबीयांच्या पदरात कशी पडेल ? मयूरभैया आंधळे यांनी इथपर्यंत स्वतः व सक्षमपणे प्रशासनासोबत राहून पाठपुरावा केला. ही धडपड व कार्य, मदत मिळवून देऊ हा मानस या कुटुंबीयांच्या कामी आला आहे. दोन दिवसांपूर्वीच या कुटुंबांना अनुक्रमे १ लक्ष रुपये व ४ लक्ष रुपयांची शासकीय आर्थिक मदत मिळवून दिली. ही किमया फक्त गावचे उच्चभूषित व कर्तव्यदक्ष सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून मिळाली आहे. हे त्रिवार सत्य आहे. मयूरभैया आंधळे यांनी रुई गांवच्या विकासासोबतच गावातील सलोखा राखण्याचा प्रयत्न तसेच त्यांची भूमिका देखील लोककल्यकारी राहिलेली आहे. म्हणूनच सरपंच असावा तर अँड. मयूर भैया आंधळे यांच्यासारखा असावा याची प्रचिती या घटनेवरून दिसून येते.

## श्री संत तुकाविप्र महाराज मठ अंजनवती येथील दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील पुरातन मठ अशी ओळख असणाऱ्या श्री संत तुकाविप्र महाराजांच्या पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान दिंडीचालक ह.भ.प.अर्जुन महाराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात श्रीक्षेत्र पंढरपूरकडे झाले असून संत नामदेव,संत तुकाराम ते संत तुकाविप्र महाराज अशी अध्यात्मिक परंपरा जोपासणाऱ्या या संत परंपरेला व त्यांच्या शतकोटी अभंग मालिकेला मानणारा मोठा वर्ग महाराष्ट्रसह संपूर्ण भारतभर आढळतो दिंडी चालक अर्जुन महाराज पाटील यांनी वयाची पंच्याहत्तरी पार केली असून साधी राहणी,संत तुकाविप्र महाराजांप्रति अपार श्रद्धा व गेली



२५ वर्षापासून अंजनवती ते पंढरपूर व पैठण असा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करतअखंडपणे सुरू ठेवलेला दिंडी सोहळा त्यामुळे अंजनवती पंचक्रोशीसह संपूर्ण बीड जिल्ह्यातील वारकरी संप्रदायावर नितांत श्रद्धा असणाऱ्या नागरिकांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे सदरील दिंडीमध्ये ग्रामस्थांसह बीड,केज, पाटोदा, कळंब, जामखेड,वाशी,भूम, परंडा आदि तालुक्यांमधून मोठ्या संख्येने वारकरी सहभाग नोंदवतात



## जीव जंतू कल्याण बोर्ड भारत सरकार तर्फे गरजू गोपालकास गाईचे वाटप

**पाटोदा । प्रतिनिधी**

जीव जंतू कल्याण बोर्ड भारत सरकार तर्फे पाटोदा येथील प्रतिनिधी श्री संतोष गर्जे यांचे तर्फे मोहरी तालुका जामखेड येथील गोपालक शेतकरी श्री विष्णू दादाराव गोपाळघरे यांना महासांगवी संस्थांनच्या महंत राधाताई महाराज यांच्या हस्ते नुकत्याच वाटप करण्यात आली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना महंत राधाताई आईसाहेब म्हणाल्या की. आपल्या भारतीय संस्कृती त गोमातेला खूप मोठा दर्जा आहे जसं की बाळाची आई गेल्यावर गाईच्या दुधावरही बाळ जगू शकते

गोमातीचे दान देते वेळी जीव जंतू कल्याण बोर्ड भारत सरकारचे सदस्य श्री संतोष श्रीराम गर्जे उपस्थित व शिवाजी नागरगोजे आणि गो प्रेमी गोरक्षक उपस्थित होते.

## चाऱ्याअभावी मुक्या जनावरांवर उपासमारीची वेळ; आष्टी तालुक्यात तातडीने चारा डेपो व पशुधन छावण्या सुरू करा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात जनावरांसाठी आवश्यक असलेल्या हिरव्या व सुक्या चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून अनेक गावांतील पशुपालक शेतकऱ्यांसमोर जनावरे जगवायची कशी, असा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. शेतकऱ्यांकडील उपलब्ध चाऱ्याचा साठा संपत चालला असून काही भागांत हिरवा चारा मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे मुक्या जनावरांवर चाऱ्याअभावी उपाशी राहण्याची वेळ येत असल्याची व्यथा पशुपालक शेतकरी व्यक्त करत आहेत.

आष्टी तालुका हा कायम दुष्काळी परिस्थितीचा सामना करणारा भाग म्हणून ओळखला जातो. शेतीबरोबरच दूध व्यवसाय, शेळी-मेंढीपालन आणि पशुपालन हे ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. मात्र सध्या चाऱ्याची उपलब्धता कमी झाल्याने पशुपालक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. जनावरांसाठी बाहेरून चारा विकत आणण्याची वेळ आली असून वाहतूक खर्चासह चाऱ्याचे वाढलेले दर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

एकीकडे शेतीतील वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि इतर आर्थिक अडचणींशी शेतकरी सामना करत असताना दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्यासाठी दररोज मोठा खर्च करावा लागत आहे. चारा उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक पशुपालकांना आपल्या जनावरांची विक्री करण्याचा कठीण निर्णय घ्यावा लागू शकतो. पशुधन कमी झाल्यास त्याचा दूध व्यवसायासह ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



**प्रशासनाने गावनिहाय सर्वेक्षण करावे**

आष्टी तालुक्यातील प्रत्येक गावातील उपलब्ध चारा साठा, पशुधनाची संख्या आणि पुढील काही महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या चाऱ्याचे प्रमाण याबाबत महसूल विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि पंचायत समिती प्रशासनाने संयुक्तपणे तातडीने सर्वेक्षण करावे, अशी मागणी पशुपालक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

ज्या गावांमध्ये चाऱ्याची गंभीर टंचाई निर्माण झाली आहे, त्या ठिकाणी तातडीने शासकीय चारा डेपो सुरू करून पशुपालकांना योग्य दरात अथवा शासनाच्या नियमानुसार चारा उपलब्ध करून द्यावा. तसेच परिस्थिती अधिक गंभीर असलेल्या भागांत पशुधन छावण्या सुरू करून जनावरांच्या चाऱ्याबरोबरच पिण्याचे पाणी, पशुवैद्यकीय उपचार आणि आवश्यक औषधांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

**लोकप्रतिनिधींनी शासन दरबारी आवाज उठवावा**

आष्टी तालुक्यातील खासदार, आमदार, माजी लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी तसेच सर्वपक्षीय नेत्यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून पशुपालक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी एकत्रितपणे शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

तालुक्यातील परिस्थिती गंभीर होण्याची वाट न पाहता जिल्हा प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून शासनाला वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. आवश्यक निधी उपलब्ध करून चारा डेपो आणि पशुधन छावण्या सुरू करण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी पशुपालक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**चाऱ्याअभावी मुक्या जनावरांचे हाल होऊ देऊ नका**

जनावरे ही शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहेत. शेतकरी स्वतः आर्थिक अडचणी सहन करून जनावरांचे संगोपन करत आहेत. मात्र चाऱ्याची टंचाई आणखी वाढल्यास मुक्या जनावरांचे हाल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासन आणि प्रशासनाने कागदी प्रक्रिया व अहवालांमध्ये वेळ न घालवता तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना पशुपालकांमधून व्यक्त होत आहे.

**''जनावरे जगवायची कशी?'' पशुपालकांचा शासनाला सवाल**

''शेतकऱ्यांकडील हिरवा आणि सुका चारा संपत आला आहे. बाजारातून चारा विकत घेणे सर्वसामान्य पशुपालकांना परवडत नाही. मुक्या जनावरांना उपाशी ठेवता येत नाही आणि चारा विकत घेण्याची आर्थिक क्षमता राहिलेली नाही. त्यामुळे शासनाने आष्टी तालुक्यातील परिस्थितीची तातडीने पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी चारा डेपो व पशुधन छावण्या सुरू कराव्यात. जनावरांचे जीव वाचवण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा,'' अशी मागणी आष्टी तालुक्यातील पशुपालक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# अन्यथा निकृष्ट बियाणे कंपन्यांची कार्यालये जाळू - बच्चू कडू

मुंबई / प्रतिनिधी

''निकृष्ट बियाणे पुरविणाऱ्या कंपन्यांवर शासनाने तातडीने कठोर कारवाई करून त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात यावेत. अन्यथा, अशा कंपन्यांची कार्यालये जाळून टाकू,'' असा इशारा आमदार बच्चू कडू यांनी दिला.

शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर नोटिसा बजावणे किंवा दंडात्मक कारवाई करून न थांबता, त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करावी. नव्या बियाणे अधिनियमात प्रति एकर किमान दोन लाख रुपये नुकसानभरपाईची सक्तीची तरतूद करावी, अशीही मागणी त्यांनी केली. राज्यात निकृष्ट बियाण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने बोगस बियाण्यांचा पुरवठा करणाऱ्या



तीन कंपन्यांविरुद्ध राज्यातील तीन जिल्ह्यांत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ही कारवाई स्वागतार्ह असली, तरी दोषी कंपन्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द होईपर्यंत शासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी आमदार कडू यांनी केली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी शासनाकडे सादर केलेल्या अहवालात बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रा. लि., छत्रपती संभाजीनगर या कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांमध्ये गंभीर अनियमितता आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे. बीज कायदा, १९६६ तसेच भारतीय बीज प्रमाणीकरणाच्या किमान मानकांचे उल्लंघन, एकाच बीजोत्पादन क्षेत्रासाठी वेगवेगळे लॉट क्रमांक वापरणे, बॅग व टॅग क्रमांकांतील तफावत, दिशाभूल करणाऱ्या हमी देणे, अप्रमाणित नमुन्यांची विक्री करणे, तसेच तपासणीदरम्यान कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून न देणे, अशा गंभीर त्रुटी अहवालात नमूद करण्यात आल्या आहेत. राज्यभर विक्री झालेल्या संबंधित बियाण्यांची तपासणी मोहीम राबवून दोषी साठा जप्त करावा, अशी मागणीही कडू यांनी केली. बोगस किंवा निकृष्ट बियाणे आढळताच संबंधित कंपनीने मोफत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून द्यावे. पेरणी, मशागत, खते, औषधे, मजुरी, सिंचन आणि उत्पादनातील नुकसानीची संपूर्ण भरपाई कंपनीकडून वसूल करण्याची कायदेशीर तरतूद करावी. शेतकऱ्यांच्या घामाची लूट करणाऱ्या कंपन्यांना व्यवसाय करण्याचा अधिकार नाही.

शासनाने कठोर कारवाई केली नाही, तर बोगस बियाणे पुरवणाऱ्या कंपन्यांची कार्यालये जाळून टाकू. शेतकऱ्यांच्या न्यायासाठीचा हा लढा कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

## बियाणे अधिनियमात बदलांची मागणी

बोगस किंवा निकृष्ट बियाणे आढळताच संबंधित कंपनीने मोफत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून द्यावे. पेरणी, मशागत, खते, औषधे, मजुरी, सिंचन आणि उत्पादनातील नुकसानीची संपूर्ण भरपाई कंपनीकडून वसूल करण्याची कायदेशीर तरतूद करावी. प्रति एकर किमान दोन लाख रुपये नुकसानभरपाई बंधनकारक करावी. दोषी कंपन्या, वितरक आणि विक्रेत्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याची स्पष्ट तरतूद करावी.

## भूजलपातळी वाढविल्यास शेतीला मोठा फायदा

दरवर्षी भरपूर पाऊस पडूनही उन्हाळ्यात विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडतात. यामागचे प्रमुख कारण म्हणजे पावसाचे पाणी साठवण्याकडे होणारे दुर्लक्ष. रेन वॉटर हार्वेस्टिंग ही सोपी आणि प्रभावी यंत्रणा घर, शेत आणि सार्वजनिक इमारतींवर बसवल्यास भूजल पातळी वाढण्यास, सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यास आणि पाणीटंचाई कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते. राज्यात दरवर्षी चांगला पाऊस पडत असला तरी उन्हाळा सुरू होताच अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट उभे राहते. यामागील प्रमुख कारण म्हणजे पावसाचे पाणी साठवण्याऐवजी ते वाहून जाऊ देणे, असे आहे. भूजल पातळी वाढवण्यासाठी प्रभावी मानली जाणारी रेन वॉटर हार्वेस्टिंग (भूजल पुनर्भरण) प्रणाली अनेक ठिकाणी अद्यापही प्रभावीपणे राबवली जात नसल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, जनजागृतीची जबाबदारी असलेल्या अनेक जुन्या शासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्येच ही यंत्रणा नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



घरांमधील पावसाचे पाणी वाया : ग्रामीण आणि शहरी भागातील बहुतांश घरांमध्ये छतावर पडणारे पावसाचे पाणी थेट नाल्यात किंवा रस्त्यावर वाहून जाते. हे पाणी जमिनीत मुरवण्याची किंवा साठवण्याची व्यवस्था नसल्याने भूजल पुनर्भरण होत नाही. परिणामी विहिरी, कूपनलिका (बोअरवेल) आणि इतर जलस्रोतांची पातळी वर्षागणिक खालावत आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग : रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे पावसाचे पाणी छतावरून किंवा मोकळ्या जागेतून वाहून जाऊ न देता, ते पाईपच्या साहाय्याने फिल्टर करून जमिनीत मुरवणे किंवा टाकी, विहीर अथवा जलसाठ्यात साठवून पुढील वापरासाठी उपलब्ध करून ठेवण्याची वैज्ञानिक पद्धत होय. ही प्रणाली भूजल पुनर्भरणासोबतच भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी प्रभावी ठरते.

रेन वॉटर हार्वेस्टिंगमुळे शेतकऱ्यांना होणारे फायदे : विहिरी आणि बोअरवेलमध्ये पाणी टिकते. पावसाचे पाणी जमिनीत मुरल्याने भूजल पातळी वाढते. त्यामुळे शेतातील विहिरी, बोअरवेल आणि कूपनलिका उन्हाळ्यातही लवकर आटत नाहीत.सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढते. भूजल साठा वाढल्याने खरीपानंतर रब्बी आणि उन्हाळी पिकांसाठीही सिंचनाचे पाणी उपलब्ध होते. दुष्काळाचा फटका कमी बसतो. कमी पाऊस पडला तरी जमिनीत साठवलेले पाणी पिकांना आधार देते. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीतही शेती टिकवणे सोपे जाते. पीक उत्पादनात वाढ. वेळेवर सिंचन झाल्याने पिकांची वाढ चांगली होते, उत्पादन वाढते आणि गुणवत्ताही सुधारते. सिंचन खर्चात बचत. टँकर, दूरवरून पाणी आणणे किंवा अधिक खोल बोअर घेण्याची गरज कमी होते. त्यामुळे उत्पादन खर्चात बचत होते. फळबागा आणि भाजीपाला सुरक्षित. आंबा, डाळिंब, मोसंबी, संत्रा, द्राक्ष तसेच भाजीपाला पिकांसाठी वर्षभर पाण्याची गरज असते. रेन वॉटर हार्वेस्टिंगमुळे या पिकांना मोठा आधार मिळतो. जनावरांसाठी पाण्याची सोय. शेतातील जलस्रोत कायम राहिल्यास पशुपालन आणि दुग्धव्यवसायासाठीही वर्षभर पाणी उपलब्ध राहते. शाश्वत शेतीला चालना. पावसाच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग झाल्याने भूजल पुनर्भरण होते आणि भविष्यातील पाण्याचे संकट कमी करण्यास मदत होते. शेतकऱ्यांनी काय करावे : शेततळे आणि फार्म पॉण्ड तयार करावेत. विहिरींचे रिचार्ज शाफ्ट तयार करावेत. घर व गोठ्याच्या छतावरील पाणी रिचार्ज पिटमध्ये सोडावे. शेतातील पाण्याचा निचरा अडवण्यासाठी चर, बांध तयार करावेत.पाणी अडवा, पाणी जिरवा या तत्त्वावर शेती नियोजन करावे. यामुळे भूजल वाढेल, सिंचनासाठी पाणी उपलब्ध राहील आणि पावसावरचे अवलंबित्व काही प्रमाणात कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न अधिक स्थिर राहण्यास मदत होईल.

## गाभण जनावरांची प्रसूतिपूर्व घ्या काळजी

गाभण जनावरांची प्रसूतिपूर्व काळजी घेतल्यास पुढे येणाऱ्या अडचणीवर मात करता येते. दुभत्या जनावरांबरोबर असणार्या म्हशींचीही काळजी घेणे दुग्ध व्यवसायाच्या दृष्टीने खूप आवश्यक आहे. म्हशींचा गाभण काळ दहा महिने दहा दिवस कालावधीचा तर गायींचा गाभणकाळ नऊ महिने नऊ दिवसांचा असतो. या काळात गाभण जनावरांचा खुराक समतोल असावा लागतो, त्यामध्ये प्रथिने, कर्बोदके, खनिज द्रव हे सर्व घटक समतोल प्रमाणात असणे गरजेचे असते.



गाभण जनावरांचे खाद्य व्यवस्थापन : भरपूर प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध असणाऱ्या हिरव्या कुरणात गाभण जनावरांना चरण्यासाठी सोडावे. त्यामुळे गाभण जनावरांना ताजी वैरण खायला मिळते. बरोबरच मोकळ्या जागेत फिरायला मिळत असल्याने मोकळी हवा, सूर्यप्रकाश आणि आवश्यक तो शारीरिक व्यायाम होतो. हिरव्या चाऱ्याची सोय नसेल तर जनावरांना गोठ्यातच भरपूर प्रमाणात हिरवा चारा खाण्यास देता येईल, अशी व्यवस्था करावी. शेवटच्या दोन महिन्यांत गर्भाची वाढ झपाट्याने होते, त्यामुळे या काळात चाऱ्यात वाढ करावी. गर्भावस्थेच्या अंतिम काळात गाभण जनावराला स्वत:च्या पोषणाकरिता किमान एक ते दीड किलो पशुखाद्य द्यावे. गर्भाच्या वाढीसाठी आणखी एक ते दीड किलो जास्तीचे पशुखाद्य देण्याची गरज असते. अशा वेळी जास्त खाद्य दिल्याने गर्भाची वाढ चांगल्या प्रकारे होते.

भाकड काळाचे नियोजन : रेतन केलेल्या तारखेची नोंद महत्त्वाची असते, त्या नोंदीनुसार तिचे दूध काढणे बंद करावे. प्रसूतीच्या अडीच ते तीन महिने अगोदर दूध काढणे बंद करावे. दूध काढणे बंद केल्यामुळे दुग्ध उत्पादनासाठी लागणारे अन्नघटक गायीची झालेली शारीरिक झीज भरून काढण्यासाठी व गर्भातील वासराच्या वाढीसाठी उपयोगात आणले जाते. पुढील वेतातील दुधासाठी कासेची वाढ सुद्धा चांगल्या प्रकारे होईल व विण्यापूर्वी गायीचे व गर्भातील वासराचे आरोग्य चांगले राहील. विण्यापूर्वी प्रत्येक गाय अडीच ते तीन महिने भाकड असावी. देशी गायीच्या दोन वेतात दीड ते दोन वर्षे अंतर राहते, त्या जेमतेम ६ ते ७ महिनेच दूध देतात म्हणजेच विण्यापूर्वी १२ ते १७ महिने ही भाकड राहतात.

मात्र संकरित गायी आणि त्यामध्ये पहिल्या वेतातील गायी वेत संपत आले तरी बरेच दूध देतात. अशा गायी आटवणे खूप आवश्यक असते. विण्यापूर्वी किमान अडीच महिने गाय भाकड राहिली पाहिजे नाहीतर त्यांचे पुढील वेतातील दूध उत्पादन निश्चितच कमी होते. गाय जर जास्त दुधाळ असेल तर याहून अधिक काळ म्हणजे तीन महिन्यांपर्यंत भाकड ठेवणे गरजेचे असते. गाय ३ ते ४ लिटर दूध देत असेल, तर धार काढणे एकदम बंद करावे. याहून जास्त दूध देणार्या गायीचा खुराक बंद करावा. धार दिवसातून दोनदा काढत असल्यास ती एकदा आणि एकदा काढत असल्यास ती दोन तीन दिवसा आड काढावी.

दूध कमी झाल्यावर एकदम धार थांबवावी. यामुळेही दूध कमी न झाल्यास गायीची हिरवी वैरण बंद करावी. आणि त्यानेही न झाल्यास एक दिवस पाणी कमी पाजावे हे उपाय योजण्यापूर्वी गायीला दुभत्या जनावरांपासून बाजूला काढून भाकड जनावरांमध्ये बांधावे. अशा रीतीने गाय आटल्यानंतर ती २-३ दिवसांत कास कमी करते, त्यानंतर तिच्या प्रत्येक सडात पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने प्रतिजैविक सोडावे. यामुळे भाकड काळात गायीला काससूज आजाराचा धोका होणार नाही. गाय पूर्णता भाकड (आटल्यानंतर) झाल्यानंतर गरजेनुसार आहार परत सुरू करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

६२२ : प्रेषित मुहम्मद पैगंबर यांनी मदिनेहून प्रयाण केले. चंद्रावर आधारित असलेल्या इस्लामिक (हिजरी) कॅलेंडरची या दिवसापासुन सुरूवात झाली.
१९४५ : अमेरिकेने तयार केलेल्या अणूबॉम्बची न्यू मेक्सिकोमधील लास अलमॉस येथील वाळवंटात चाचणी
१९५१ : ब्रिटन देशाने नेपाल देशाला स्वतंत्र घोषित केलं.
१९६५ : ईटली व फ्रान्सला जोडणार्या माँट ब्लँक बोगद्याचे उद्घाटन झाले.
१९६९ : चंद्रावर पहिला मानव उतरवणार्या 'अपोलो-११' अंतराळयानाचे फ्लोरिडा येथुन प्रक्षेपण
१९८१ : भारताने अणुबॉम्ब ची चाचणी केली.
१९९२ : भारताचे नववे राष्ट्रपती म्हणून डॉ. शंकरदयाळ शर्मा यांची निवड झाली. तत्पुर्वी ते उपराष्ट्रपती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल होते.
१९९८ : गुजराथमधे शाळेतील प्रवेशाच्या वेळी पाल्याच्या नावानंतर आईलाही नाव लावण्याचा अधिकार आहे; असा निर्णय घेतल्याची माहिती गुजराथच्या शिक्षण राज्यमंत्री श्रीमती आनंदीबेन पटेल यांनी विधानसभेत दिली.
२००६ : संयुक्त राष्ट्र परिषदेने कोरिया राष्ट्रावर बंदी घालण्याच्या ठरावास मंजूरी दिली.
२००७ : बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीना वाजीद यांना भ्रष्टाचार प्रकरणी कैद करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : सुप्रसिद्ध युरोपियन चित्रकार व रॉयल अकॅडमीच पहिले अध्यक्ष व्यंगचित्रकार सर जोशुवा रेनाल्ड्स यांचा जन्मदिन.
१७७३ : सर जोशुआ रेनॉल्ड्स ब्रिटिश चित्रकार व रॉयल अ‍ॅकॅडमीचे पहिले अध्यक्ष, व्यक्तिचित्रे काढण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी होती. (मृत्यू: २३ फेब्रुवारी १७९२ लंडन, इंग्लंड)
१८९६ : नॉर्वे देशांतील प्रसिद्ध राजकीय राजकारणी, कामगार नेते सरकारी अधिकरी व लेखक तसचं, संयुक्त राष्ट्र संघाचे पहिले सरचिटणीस ट्रिग्वे हलवदान ली यांचा जन्मदिन.
१९०९ : अरुणा असफ अली स्वातंत्र्यसेनानी. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवला होता. लेनिन शांतता पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, पद्मविभूषण, आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, भारतरत्न (मरणोत्तर) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (मृत्यू: २९ जुलै १९९६)
१९२३ : के. व्ही. कृष्णराव भूदल प्रमुख, जम्मू काश्मीर, नागालँड, मणिपूर व त्रिपूराचे राज्यपाल
१९१३ : स्वामी शांतानंद सरस्वती ज्योतिर्मठाचे शंकराचार्य (मृत्यू: ७ डिसेंबर १९९७ अलाहाबाद, उत्तर प्रदेश)
१९१४: वामनराव कृष्णाजी तथा वा. कृ. चोरघडे साहित्यिक (लघुकथा, लोककथा, बालवाङ्मय, चरित्र, अनुवाद), विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३० नोव्हेंबर १९९५)
१९१७ : जगदीश चंद्र माथूर नाटककार व लेखक (मृत्यू: १४ मे १९७८)
१९४३ : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (मृत्यू: ६ जानेवारी २०१०)
१९६८ : धनराज पिल्ले हॉकी पटू
१९७३ : शॉन पोलॉक दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटपटू
१९८३ : ब्रिटीश वंशीय भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कतरिना कैफ यांचा जन्मदिन.
१९८४ : कतरिना कैफ चित्रपट कलाकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३४२ : चार्ल्स (पहिला) हंगेरीचा राजा (जन्म:१२८८)
१८८२ : अमेरिकेचे माजी राष्ट्रपती अब्राहम लिंकन यांच्या पत्नी मेरी टॉड लिंकन यांचे निधन.
१९८६ : वासुदेव सीताराम तथा वा. सी. बेन्द्रे इतिहासकार (जन्म: १३ फेब्रुवारी १८९४)
१९९३ : उस्ताद निसार हुसेन खाँ पद्मभूषण (१९७०), रामपूर साहसवान घराण्याचे तराणा व ख्यालगायक, संगीत संशोधन अकादमीचे निवासी शिक्षक, आकाशवाणी कलाकार, उस्ताद राशिद खाँ यांचे गुरू (जन्म:१९०९)
१९९४ : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ ज्युलियन श्विन्गर यांचे निधन.
२००५ : रॅमन मॅग्सेसे पुरस्कार विजेता प्रसिद्ध भारतीय कन्नड भाषिक नाटककार आणि निनासम धर्म संस्था संस्थेचे संस्थापक के. वी. सुबन्ना यांचे निधन.
२००९ : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय कर्नाटिक संगीतकार व तमिळ चित्रपट पार्श्वगायिका दमल कृष्णस्वामी पट्टममल यांचे निधन.
२०१३ : प्रसिद्ध भारतीय इतिहासकार व प्राध्यापक तसचं, सोशल सेंटर फॉर स्टडीज इन सोशलचे संस्थापक-संचालक बरुण डी यांचे निधन.

## सेंद्रिय शेतीमध्ये जैविक कीड व रोग व्यवस्थापन

''जिवो जिवोस्य जीवनम्'' म्हणजे एक जीव दुसऱ्या जीवावर जगतो. निसर्गामध्ये वावरणारे जीवजंतू हे सुद्धा एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे ते आपल्या भक्ष्याच्या शोधात असतात व त्यामुळेच निसर्गाचे संतुलन साधले जाते. सेंद्रिय शेतीमध्ये नेमका याच तत्वाचा उपयोग करून काही प्रमाणात कीड, रोग व खत व्यवस्थापन करता येते. आपण उन्हाळ्यात नांगरणी करतो. त्यामुळे बऱ्याच किडी ज्यांच्या काही अवस्था जमिनीत असतात त्यांचे उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे नियंत्रण करता येते.

काही बुरशीजन्य कीटकनाशके अत्यंत प्रभावी आढळून आले आहेत. ज्यामध्ये मेटॅरायझियम ॲनिसोप्ली, बेव्हेरीया बॅसियाना, नोमोरिया रिली, व्हरटीसिलीयम लेक्यानी, पॅसिलोमायसीस लील्यासिनस या बुरशींचा समावेश होतो, तर जिवाणूजन्य कीटकनाशकामध्ये बॅसीलस थुरोंजेनीसीस तर एच. एन. पी. व्ही. हा विषाणू कीड नियंत्रणात उपयोगात येत आहे. मेटॅरायझियम या बुरशीमुळे मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे, हुमनी, बोंडअळी, खोडकिडा (ज्वारी) तर बेव्हेरीया या बुरशीमुळे मावा, ज्वारीवरील खोडकिडा, भातावरील काटेरी भुंगा, बोंडअळी, तुडतुडे, तंबाखुची पाने खाणारी अळी, नोमोरिया या बुरशीमुळे पतंगवर्गीय कीटक जसे बोंडअळी, उंटअळी तर व्हरटीसिलीयम लेक्यानी या बुरशीमुळे मावा, पांढरी माशी, फुलकिडे, कोळी आणि पॅसिलोमायसीस लील्यासिनस या बुरशीमुळे मुख्यत: पान व केळी पिकांवरील सुत्रकृमींचा बंदोबस्त करता येतो.

बुरशीजन्य कीटकनाशके फवारणी केल्यानंतर तोंडावाटे किंवा किडींच्या शरिरावाटे




प्रवेश करून शरिरात जाळे तयार करून वाढत जाते, त्यामुळे किडींची वाढ खुंटते व अन्न खाणे बंद होते. किडीचे उच्चाटण झाल्यावर बीजाणूची पैदास होते व हेच बीजाणू नंतर दुसऱ्या किडीवर प्रादुर्भाव करतात. किडींप्रमाणे रोगनियंत्रण करण्यासाठी सुद्धा काही सुक्ष्म जिवांचा वापर करता येतो, त्यामध्ये प्रामुख्याने ट्रायकोडर्मा, बॅसीलस, सुडोमोनस, ॲस्परजिलस या सुक्ष्म जिवांचा अंतर्भाव होतो. मुख्यत: या सर्व सुक्ष्म जिवांचा वापर बिजप्रक्रिया करून त्याद्वारे बियांपासून व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांचे नियंत्रण करण्यासाठी होतो. त्यामध्ये रायझोकटोनिया द्वारे होणारी मुळसड, पिथियम द्वारे होणारे रोप कोलमडणे, फ्युजारीयम द्वारा होणारा मर रोग, स्क्लेरोशियम बुरशीमुळे होणारी कुज याचा प्रामुख्याने समावेश करता येईल परंतु आता या सुक्ष्म जिवाबाबत अधिक संशोधन होऊन बियांपासून पसरणारे मुळांना होणाऱ्या रोगांचाच नव्हे तर पिकांच्या इतर भागावर येणाऱ्या रोगांना अटकाव करण्यासाठी सुद्धा अश्या बुरशी अथवा जीवाणूचा वापर होत आहे त्यात प्रामुख्याने कपाशीवरील जीवाणू करपा या रोगाचा अटकाव सुडोमोनस या उपयोगी जीवाणूद्वारे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे इतर ही पानावरील ठिपके या रोगाचे व्यवस्थापनासाठी या जीवाणूचा प्रभावीपणे वापर होत आहे. तसेच ॲम्पेलोमायसेस क्विसकॅलिस बुरशीचा वापर भुरी (पावडरी मिल्ड्यु) रोगाच्या नियंत्रणासाठी केला जातो.

इतकेच नव्हे तर काही सुक्ष्म जिवांचा उपयोग पिकांना अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्यासाठी होतो व त्यामुळे अनेक मुलद्रव्यांचा योग्य पुरवठा करता येतो. त्यामध्ये मुख्यत: रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पायरीलम, स्फुरद विघटन करणारे सुक्ष्म जीव, निळे हिरवे शेवाळ यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

रायझोबियम या जीवाणूची बिजप्रक्रीया शेंगवर्गीय पिकांना, नत्रपुरवठा करण्यासाठी होतो. परंतु एकच रायझोबियम सर्व पिकांना चालत नाही त्याचे सात गट आहेत.

१)चवळी गट - चवळी, भुईमुंग, तूर, मुंग, मटकी, उडीद, गवार, वाल इत्यादी. २) वाटणा गट - वाटणा. ३) हरभरा गट - हरभरा. ४) घेवडा गट - घेवडा व राजमा. ५) सोयाबीन - सोयाबीन. ६) अल्फा - अल्फा, ल्युसर्न गवत. ७) बरसीम - बरसीम

ॲझोटोबॅक्टर या जीवाणूची बिजप्रक्रीया एकदल पिकासाठी करण्यात येते. उदा. गहू, ज्वारी, मका, बाजरी, त्याचप्रमाणे फळझाडे व फुलझाडे यासाठी सुद्धा याचा वापर करता येतो. सधारणत: जैविकांची बिजप्रक्रीया २० ते २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात करावी व स्टीकर म्हणून गुळाचे द्रावण वापरावे, या जैविकांमुळे आपल्याला जवळपास २० टक्के पर्यंत उत्पादनात वाढ मिळते परंतु जैविक उत्पादने वापरतांना, जैविक खत/ किटकनाशक, बुरशीनाशक गुणवत्ता योग्य असणे गरजेच आहे त्याला सधारणत: उत्पादन केल्यापासून ६ महिन्याचा कालावधी असतो, त्या कालावधीत त्याचा वापर होणे गरजेचे असते. फवारणी तीव्र उन्हात करु नये, ह्यात जैविक घटक असल्याने फवारणीसाठी वातावरण पोषक असणे गरजेचे आहे.

फायदे : मित्र कीड किंवा मित्र बुरशीचा नाश होत नाही. फळे व भाजीपाला यावर विषारी घटक राहत नाही. परदेशी बाजारपेठ मिळते. किडीमध्ये प्रतिकारक शक्ती तयार होत नाही. पिकांत वावरणाऱ्या पक्ष्यांवर विपरीत परिणाम होत नाही.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# जालना ते पंढरपूर पायी दिंडीचे जेपीसी बँकेच्यावतीने स्वागत

## विठ्ठलाच्या कृपेमुळेच बँक सुव्यवस्थित–सतीश पंच

जालना । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठूनामाच्या जयघोषात निघालेल्या श्री ढवळेश्वर महादेव पालखी सोहळा आणि श्री संत कपील ऋषीमुनीजी पालखी सोहळ्याचे (जालना ते पंढरपूर पायी यात्रा) जालना पीपल्स बँकेच्यावतीने स्वागत करण्यात येऊन वारकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.दरवर्षी ही पालखी जेपीसी बँकेसमोरून पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ होते. रविवारी (ता. १२) सकाळी ११ वाजता चेअरमन सतीश पंच, व्हाईस चेअरमन यांनी किशोर देवीदान यांनी पालखीतील वारकऱ्यांचे स्वागत केले. यावेळी संचालक संजय मुथा, दीपक भुरेवाल, सुनील चौधरी, ॲड. ओक, अनिल संचेती, राजकुमार दायमा, सुनील बियाणे, अभय करवा, तसेच तज्ञ संचालक निखिल बाहेती, बँकेचे सभासद अशोक जोगड, बँकेचे महाव्यवस्थापक विजय जोशी, व्यवस्थापक विलास जाधव, सर्व अधिकारी, कर्मचारी




आणि मोठ्या संख्येने वारकरी व भाविक उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेअरमन सतीश पंच म्हणाले की, जालना पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँकेवर विठ्ठलाचा मोठा आशीर्वाद आहे आणि याच कृपेमुळे आज आपली बँक अत्यंत सुव्यवस्थित आणि प्रगतीपथावर आहे. बँकेत सेवक म्हणून कार्यरत असलेले दिवंगत नारायण शर्मा यांनी जेपीसी बँकेच्या नावाने दरवर्षी पंढरपूरसाठी दिंडी काढण्याची एक पवित्र परंपरा सुरू केली होती. नारायण शर्मा आज आपल्यात नसले, तरीही त्यांनी सुरू केलेली ही जुनी परंपरा जेपीसी बँकेने आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने कायम ठेवली आहे. दरवर्षी बँके जवळूनच पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ होते. विठ्ठलाच्या आशिर्वादामुळेच बँकेची वाटचाल अविरत सुरू आहे, असे सतीश पंच म्हणाले. दिंडीचे व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दिंडी व्यवस्थापक गणेश सुरोसे आणि गंगाधर खरात यांच्या मार्गदर्शनाखाली केले जात आहे. पालखी सोहळा शहरात दाखल झाल्यानंतर विठ्ठल–रखुमाई आणि पालखीचे पूजन करण्यात आले. टाळ–मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानबा–तुकाराम' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता.

## कार्यकारी अभियंता सविता शालगर यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव शासनाला सादर

### शाखा अभियंता,कनिष्ठ अभियंता निलंबित




जालना। प्रतिनिधी

जिल्हा परिषदअंतर्गत रस्त्यांच्या कामामध्ये आर्थिक अनियमितता आढळल्याने बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती सविता शालगर यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. इंदेवाडी ते सिरसवाडी या अंदाजे १८ लाख रुपयांच्या रस्त्याचे काम न करताच यात आर्थिक अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी आढळून आले.

याप्रकरणी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता अनिल इंगळे आणि कनिष्ठ अभियंता या दोघांना यापुर्वीच निलंबित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषद अंतर्गत रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्यासाठी समिती देखील स्थापन करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती सविता शालगर यांच्या कार्यकाळात रस्त्यांच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता उघडकीस आल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे प्रस्तावित होते.

त्यानुषंगाने श्रीमती शालगर यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनाला पाठवण्यात आला असून, आगामी काळात चौकशी सुरु असलेल्या कामांमध्ये किती प्रमाणात अनियमितता आढळून येते, या सर्व बाबींवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांनी लक्ष दिल्याने जिल्हा परिषद प्रशासन एकंदर कारवाईच्या तयारीत असल्याने आणखी निलंबनाची व चौकशीची कुऱ्हाड कोणा कोणावर कोसळणार तसेच कार्यकारी अभियंता श्रीमती शालगर यांच्या विभागीय चौकशीबाबत शासन काय निर्णय घेईल याकडे लक्ष लागून आहे.

## परवाने रद्द करूनही संगम आणि हॉटेल सत्कार सुरू कसे?

पाथर्डी / प्रतिनिधी

अहिल्यानगर शहरातील हॉटेल संगम व हॉटेल सत्कार यांच्यावर अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या गौरव जगताप यांच्या पथकाने ०७ जुलै रोजी धाड टाकून हॉटेलमधील अस्वच्छता व किचन मधील भेसळ अशा अनेक मुद्द्यांमुळे दोन्ही हॉटेलचे परवाने रद्द केले. परंतु सदरील दोनही हॉटेल परवाना रद्द करून सुद्धा पुर्ववत सुरू असल्याचे निदर्शनास येत आहेत. याबाबत उलटसुलट चर्चा होत आहे.

अधिकाऱ्यांनी तपासणी करून कारवाई केल्यानंतर २४ तासाच्या आत हॉटेल संगम व हॉटेल सत्कार यांनी अन्न व औषध प्रशासनकडे अपील केले. परंतु कायदा असे सांगतो की जोपर्यंत अपिलाचा निकाल लागत नाही तोपर्यंत परवाने रद्द केलेले हॉटेल्स सुरू ठेवता येत नाहीत. मात्र हे हॉटेल सुरू असल्याने अन्न औषध प्रशासन अधिकारी गौरव जगताप व त्यांच्या पथकातील फूड इन्स्पेक्टर व अन्य कर्मचारी यांनी याकडे का दुर्लक्ष केले याबाबत जोरदार चर्चा होत आहे.

अहिल्यानगर अन्न औषध विभागातील सहाय्यक आयुक्त अपर्णा भोईटे व गौरव जगताप यांच्या विरोधात निवेदन प्राप्त झाले आहे. भोईटे व जगताप यांच्या पथकाने अहिल्यानगर शहरातील व ग्रामीण भागातील काही हॉटेल्सवर कारवाया केल्या. काही हॉटेलचे परवाने रद्द केले तरीसुद्धा हॉटेल सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मुंबई अन्न औषध विभाग उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली असून, दोषीवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल

– संतोष कांबळे (सहाय्यक आयुक्त अन्न औषध विभाग, मुंबई.)

## पैठण–पंढरपूर पालखीचे दिघोळ येथे उत्साहात स्वागत; खर्डा शिवपट्टणकडे प्रस्थान

दिघोळ। प्रतिनिधी

शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या श्रीक्षेत्र पैठण (जि. छत्रपती संभाजीनगर) येथून निघालेल्या पैठण–पंढरपूर पालखी सोहळ्याचे दिघोळ येथे भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. दि. १४ जुलै रोजी पालखी दिंडी दिघोळ येथे मुक्कामी दाखल झाली. यावेळी हरिनामाच्या गजरात, टाळ–मृदंगाच्या निनादात आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात वारकरी व भाविकांनी मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत केले.

आषाढी एकादशीनिमित्त राज्याच्या विविध भागांतून हजारो वारकरी पंढरपूरच्या दिशेने पायी प्रवास करीत आहेत. त्याच परंपरेचा भाग म्हणून संत एकनाथ महाराजांची पालखी पैठण येथून पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. या पालखीचा दिघोळ येथे मुक्काम झाला.

दि. १५ जुलै रोजी दुपारी १२ वाजता वारकरी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पालखी खर्डा शिवपट्टणकडे पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाली. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या सोयीसाठी प्रशासन व ग्रामपंचायतीच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये मोठा मंडप, शौचालय, स्नानगृह, प्रकाश व्यवस्था, रस्त्याचे मुरमीकरण, वैद्यकीय सुविधा, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन यांचा समावेश होता. गटविकास अधिकारी शुभम जाधव यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी, खर्डा पोलीस प्रशासन व विविध विभागांचे अधिकारी पालखी सोहळ्याच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवून होते. खर्डा शिवपट्टण येथे मुक्कामानंतर पालखीचा पुढील प्रवास पंढरपूरच्या दिशेने सुरू राहणार आहे. यंदाचा पालखी सोहळा १८ दिवसांचा असून, महाराष्ट्रातील विविध भागांतील हजारो वारकरी या भक्तिमय यात्रेत सहभागी झाले आहेत. यंदा संत एकनाथ महाराजांच्या पादुकांची पालखी आकर्षक चांदीच्या रथातून नेण्यात येत आहे. सुमारे १२० किलो शुद्ध चांदी वापरून तयार करण्यात आलेल्या या रथावर ११० घनफूट सागवानी लाकडावर नक्षीकाम करण्यात आले आहे. या रथासाठी अंदाजे २१ लाख रुपये खर्च झाल्याची माहिती आहे. भगवी पताका, हातातील टाळ–मृदंग आणि मुखी विठ्ठलनामाचा गजर करत वारकरी ऊन–पावसाची पर्वा न करता शेकडो वर्षांची परंपरा जपत पैठण ते पंढरपूर असा पायी प्रवास करीत आहेत. संत एकनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यातून भक्ती, समता आणि वारकरी परंपरेचे अनोखे दर्शन घडत आहे.

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे–दानवे

जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेच्या आज दि.१४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रभाग क्र. १ चे नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी प्रभागातील तसेच संपूर्ण शहराशी निगडित विविध जनहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.सभेत बोलताना भास्कर आबा दानवे यांनी दत्तनगर, गायत्री नगर व कोठारी नगर परिसरात नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले. यामुळे घरगुती साहित्य, फर्निचर, विद्युत उपकरणे तसेच दैनंदिन वापराच्या वस्तूंचे मोठे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आणून दिले. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना



म्हणून या परिसरातील पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह योग्य नियोजन करून सीना नदीकडे वळविण्यात यावा.

याशिवाय शहरात दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या आणि विस्तारणारी हद्द लक्षात घेता विद्यमान सफाई कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे अनेक भागांत नियमित साफसफाई होत नसून नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी या उद्देशाने शहरातील प्रमुख २५ चौकांचे सुशोभीकरण करण्यात येणार असून त्यामध्ये संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या नावाने जागा निश्चित करून चौक निर्माण करावा व त्या चौकाचे सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच जालना शहरातील प्रमुख रस्त्यावरील पथदिवे हे रस्त्याच्या मधोमध असून त्यामुळे नागरिकांना व वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत असून, अपघाताचे प्रमाण वाढले आहे, त्या अनुषंगाने शहरातील मधोमध असलेले विद्युत पोल तात्काळ हटविण्यात यावे. याशिवाय जालना शहरातील क्रीडाप्रेमी युवक–युवती, विद्यार्थी आणि खेळाडूंसाठी चांगल्या दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असे एक उच्च दर्जाचे स्टेडियम उभारण्यात यावे.

## घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शाळेचा रस्ता बनला चिखलमय !

घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील मासेगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, सततच्या पावसामुळे संपूर्ण रस्ता चिखलमय बनला आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खोल खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या न पार्श्वभूमीवर समस्त ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या न मुख्य अभियंत्यांना निवेदन देत रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, सुमारे ५०० मीटर लांबीचा हा रस्ता वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. यंदाच्या पावसामुळे रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली असून, चिखल आणि खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत धरून शाळेत जावे लागत आहे. लहान मुले घसरून पडण्याचा धोका वाढला असून पालकांमध्येही तीव्र चिंतेचे वातावरण आहे. या रस्त्याचा वापर केवळ शाळकरी विद्यार्थीच नव्हे, तर ग्रामस्थ, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वार मोठ्या प्रमाणावर करतात. मात्र रस्त्यावर साचलेले पाणी, खोल खड्डे आणि चिखल यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. प्रविण आर.शिंदे दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १०८२/२०२६**

**ॲड.एन. के . सिरसट**

**चंद्रभान पि. खंडु जगताप व इतर वि. निरंक**

अर्जदार : १. चंद्रभान पि. खंडु जगताप, वय–५७ वर्षे, धंदा–शेती, रा.भवानवाडी, पो.शिवनी ता.जि.बीड, २. कचरु पि. खंडु जगताप, वय ४८ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ३. सोपान पि. खंडू जगताप, वय–४० वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ४. संदीपान पि. खंडू जगताप (मयत), ४.१) अश्विनी भ्र.संदीपान जगताप, वय–३४ वर्षे, धंदा–घरकाम, ४.२) प्रगती पि. संदीपान जगताप, वय–१५ वर्षे, धंदा–शिक्षण, ४.३) पायल पि. संदीपान जगताप, वय–१३ वर्षे, धंदा–शिक्षण, ४.४) प्रथमेश पि. संदीपान जगताप, वय–१० वर्षे, धंदा–शिक्षण, (अर्जदार क. ४.२ ते अर्जदार क. ४.४ मार्फत अ.पा.क.आई अर्जदार क. ४.१) वरील सर्व रा. वरीलप्रमाणे

गैरअर्जदार विरुध्द निरंक

प्रकरण:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यानी मयत खंडू पि. खेमा जगताप व कस्तुराबाई भ्र. खंडु जगताप यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत मयत खंडू पि. खेमा जगताप हे दिनांक ०४/०३/२०२३ व कस्तुराबाई भ्र. खंडू जगताप हया २०/१०/२०२३ रोजी दोघांचा राहत्या घरी मौजे भवानवाडी ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ते अर्जदार क. ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ४ हा मयताचा मयत मुलगा आहे. अर्जदार क. १.१ ही मयताचा मयत मुलाची पत्नी असून अर्जदार क ४२ व ४३ हे मयताचा मयत मुलाची मुले असून अर्जदार क. ४४ हा मयताचा मयत मुलगा याचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क ४.२ ते ४.४ ही अज्ञान असून त्यांची अ. पा.क. जन्मदाती आई अर्जदार क. ४.१ ही आहे. अर्जदारांशिवाय मयतास ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत खंडू पि. खेमा जगताप व कस्तुराबाई भ्र.खंड जगताप रा. भवानवाडी ता.जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख २०/०८/२०२६. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

स्वाक्षरित/–
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२–४८३–२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–५९०**

**दिनांक – १५/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकरी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नागेश दिपक खरात रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नागेश दिपक खरात | मुलगी | १३/०९/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.


आज दिनांक– / /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## आरोग्याच्या निर्देशांकामध्ये सुधारणा करा अन्यथा कार्यवाही होणार–जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

जिल्हास्तरीय कृतीदल समितीची सभा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. नियमित लसीकरण, गोवर रुबेला निर्मुलन, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (एनक्युएएस), एच.पी.व्ही. लसीकरण, इत्यादी बाबत आढावा घेतांना काही निर्देशांकामध्ये काम कमी असल्याचे निदर्शनास आले तेव्हा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्पष्ट निर्देश दिले की, आरोग्याच्या निर्देशांकामध्ये सुधारणा, गुणात्मक काम करा अन्यथा सक्त कार्यवाही करण्यात येईल.



एच.पी.व्ही. लसीकरण जिल्ह्यात अत्यंत कमी असुन ते वाढविण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक यांना दिले. एच.पी.व्ही. लसीकरण वाढविण्यासाठी शाळांना भेटी देवुन पालकांचे समुपदेशन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमाचा संपुर्ण आढावा व मार्गदर्शन सहाय्यक संचालक, आ.से. कुष्ठरोग डॉ. सुधाकर शेळके यांनी घेतला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी पल्स पोलिओ, एच.पी.व्ही. लसीकरण, गोवर व रुबेला दुरीकरण मोहिम विषयी माहिती दिली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा आढावा घेऊन सांगितले की, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा लाभ रुग्णांना द्यावा. तसेच त्यांनी जन्म व मृत्यूचा आढावाही घेतला. रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देवुन रेफर करणे शक्यतो टाळावे. आपल्या आरोग्य संस्था नियमित स्वच्छ असाव्यात. तालुका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या पी.एच.सी.ला नियमित भेटी देऊन सर्व आरोग्य उपक्रमांचा आढावा घेऊन स्वच्छता पाहणी करण्याचे सांगितले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. जयश्री भुसारे जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ. राजेंद्र पाटील, गटविकास अधिकारी विनय पवार, कौशल पाटील, प्रगती इंगवले, लायन्स क्लबचे डॉ. गिरीश पाकणीकर, आरोग्य अधिकारी डॉ. एस. झेड गवारे व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. जगदीश बनसोडे, डॉ. श्रीकांत देसाई डॉ. एन.जी.पवार, वैद्यकिय अधिक्षक, तालुका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**टीसी हरवला आहे**

मच्छिन्द्र आत्माराम शिंगाडे या नावाचा बारावी विज्ञान पासचा टिसी गेवराई ते तळणेवाडी प्रवासा दरम्यान हारवला आहे. सापडल्यास तात्काळ संपर्क करावा.
मोबाईल नंबर
९५२७११९३७४

**टीसी हरवला आहे**

अक्षय विष्णू तांबारे या नावाचा इ.१०वी पासचा टीसी (दाखला) बीड ते तागडगाव पाथर्डी बस प्रवासामध्ये हरवला आहे सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
संपर्क : ९९२१०७४२८७

**टीसी हरवला आहे**

सुमितराज केशव डोंगरे या नावाचा इ.१०वी पास चा टीसी (दाखला) बीड ते तागडगाव पाथर्डी बस प्रवासामध्ये हरवला आहे सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
संपर्क:९११२४९५०५६

**टीसी हरवला आहे**

समर्थ गोविंद तांबारे या नावाचा इ.१२ वी पास चा टीसी (दाखला) बीड ते तागडगाव पाथर्डी बस प्रवासामध्ये हरवला आहे सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
संपर्क: ७६६६४२०४८४

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

गुरुवार दि.१६ जुलै २०२६


# दूध उत्पादकतेसाठी महाराष्ट्र हा देशात सर्वोत्तम प्रदेश -आ.सुरेश धस

## वीस गाईंचे दूध व्यवस्थापनातून जिल्हाधिकाऱ्यांच्या वेतनाएवढे उत्पन्न -संदीप सिंग

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती आणि कष्टकरी शेतकरी यांच्यामुळे महाराष्ट्र राज्य हे दूध उत्पादन व्यवसायासाठी देशात सर्वोत्तम प्रदेश आहे त्यामुळे युवकांनी दूध उत्पादन हा पूरक व्यवसाय न समजता शेती पेक्षा प्रधान व्यवसाय समजून नियोजनबद्ध पद्धतीने दुग्ध व्यवसाय करावा असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले

तर वीस,तीस गाईंचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन करताना त्यांची लागवड, खाद्य खुराक आणि गोठ्याचे व्यवस्थापन केल्यास जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या वेतनाइतके आर्थिक उत्पन्न मिळू शकते असे प्रतिपादन पंजाब येथील प्रसिद्ध दुग्ध व्यवसायिक संदीप सिंग यांनी केले तर नियोजनबद्ध दुग्ध व्यवसाय केल्यास आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी तरतूद करता येईल असे प्रतिपादन हरप्रीत सिंग यांनी केले आष्टी येथील आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने दुग्ध उत्पादन वाढीविषयी मार्गदर्शन मेळाव्यामध्ये ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले उपस्थित होते

यावेळी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की महाराष्ट्र राज्याची भौगोलिक



नैसर्गिक परिस्थिती आणि कष्टकरी शेतकरी यांच्यामुळे संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य हा सर्वोत्तम प्रदेश असल्यामुळे महाराष्ट्रातील युवक शेतकऱ्यांनी शेती हा प्रथम व्यवसाय न समजता दुग्ध व्यवसाय हा प्रथम व्यवसाय समजावा चांगल्या शेतकऱ्यांनी दूध उत्पादनाकडे वळावे आणि दुसऱ्या शेतकऱ्यांना देखील चांगले सांगावे आपापसात सहकार्य करावे दूध व्यवसाय सुरू करताना लागवडीसाठी दर्जेदार असलेले डब्ल्यू डब्ल्यू एस, एबीएस आरमाडा, ऑस्कर, रॅन्लर हे सेक्स सॉर्टेड सिमेन म्हणजे केवळ कालवडी जन्मतील असे सिमेन वापरावे याबाबत दूध उत्पादकांनी अत्यंत जागृत राहून दर्जेदार सिमेन वापरावे गाईंचे लागवडीपासून प्रसूतीपर्यंत खाद्याचे खुराक प्रोटीन मिनरल मिक्स्चर याबाबतचे मार्गदर्शन घेऊन चांगल्या कालवडीची निर्मिती करावी अशा पद्धतीने आज गाय २० लिटर दूध देत असेल तर होणारी कालवड ही २५ ते ३० लिटर दूध देऊ शकते संदीप सिंग आणि हरप्रीत सिंग या बंधूंनी अतिशय शून्यातून दुग्ध व्यवसाय सुरू केला असून या व्यवसायात त्यांनी मोठी झेप घेतली आहे त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील दूध उत्पादकांनी दूर व्यवसायासाठी वाढीसाठी मार्गदर्शन घ्यावे आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ त्यासाठी सदैव तयार आहे चांगल्या दर्जेदार गाई निर्मिती झाल्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये दुग्ध व्यवसायाला अतिशय चांगले दिवस येणार असून गाईंची किंमत वाढणार आहे आणि दुधाची देखील किंमत वाढणार आहे त्यामुळे युवक शेतकऱ्यांनी शेती ◀◀ पान ३ वर

## पत्नीच्या निघृण खुनाप्रकरणी पतीला जन्मठेप बीड सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

बीड । प्रतिनिधी

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या करणाऱ्या पतीला बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या निकालामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

आरोपी शरामत ऊर्फ समीर कादर शेख (रा. अखेरवाडा, ता. पैठण) हा आपल्या पत्नी शबाना हिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. २५ ऑगस्ट २०२३ रोजी मध्यरात्री चकलांबा येथील अंबिरबाबा दर्गा येथे मुक्कामी असताना, आरोपीने झोपेत असलेल्या पत्नीच्या डोक्यावर ७.३८० किलो वजनाचा मोठा दगड टाकून तिची निघृण हत्या केली होती. या घटनेप्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

माननीय जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. दिनेश पी. सुराणा यांनी आरोपीला दोषी ठरवत जन्मठेप आणि २५,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास सहा महिन्यांची अतिरिक्त सक्तमजुरी भोगावी लागेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सुनावणीदरम्यान आरोपीने मानसिक आजाराचा बचाव मांडण्याचा प्रयत्न केला होता, मात्र ठोस पुराव्याअभावी न्यायालयाने तो फेटाळून लावला. न्यायालयाने उपलब्ध पुरावे, परिस्थितीजन्य घटनाक्रम आणि वैज्ञानिक विश्लेषणाच्या आधारे हा मृत्यू अपघाती नसून पूर्वनियोजित खून असल्याचे स्पष्ट केले. या खटल्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे हा संपूर्ण खटला परिस्थितीजन्य, वैज्ञानिक आणि वैद्यकीय पुराव्यांवर आधारित होता. सरकारी पक्षातर्फे ॲड. ए. डी. राख यांनी प्रभावी युक्तिवाद केला, तर या खटल्यात एकूण ११ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी या गुन्ह्याचा तपास अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने पूर्ण केला.

बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दोषसिद्धी कक्षाच्या पथकाने या प्रकरणात प्रभावी पैरवी केली. बीड पोलीस गंभीर गुन्ह्यांविरुद्ध 'शून्य सहनशीलता' धोरणाने कार्यरत असून, हा निकाल म्हणजे शास्त्रशुद्ध तपासाची एक ठोस पावती असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## नारायणगड, गहिनीनाथ गडाच्या दिंडी प्रस्थान सोहळ्यात डॉ.योगेश क्षीरसागरांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या श्री.क्षेत्र नारायणगड आणि श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थानच्या दिंडींना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित राहून निरोप दिला. यावेळी त्यांनी महंत व वारकरी संप्रदायातील मान्यवरांचे आशीर्वाद घेत वारकऱ्यांना मंगलमय वारीच्या शुभेच्छा दिल्या.



श्री.क्षेत्र नारायणगड येथे आयोजित कार्यक्रमात डॉ.क्षीरसागर यांनी संस्थानचे महंत ह.भ.प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांचे शुभाशीर्वाद घेतले. तसेच श्री नगद नारायण महाराजांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेऊन प्रार्थना केली. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे निघालेल्या दिंडीतील वारकऱ्यांना त्यांनी शुभेच्छा देत सुखरूप व यशस्वी वारीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. त्यानंतर पाटोदा तालुक्यातील श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थानच्या दिंडीच्या प्रस्थान सोहळ्यासही त्यांनी हजेरी लावली. यावेळी ह.भ.प. विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेत त्यांनी वारकरी बांधवांशी संवाद साधला. तसेच निवडुंगा येथील महाराजांच्या कीर्तनसेवेचा लाभ घेत भक्तिरसाचा आनंद अनुभवला.

यावेळी परिसरातील वारकरी, भाविक, ग्रामस्थ तसेच संस्थानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विठ्ठलभक्ती, संत परंपरा आणि वारकरी संस्कृती जपणाऱ्या या दिंडींना निरोप देताना संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. ◀◀ पान ३ वर

## होळची जलजीवन मिशन योजना कार्यान्वित करण्यासाठी पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांचे आमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील केज तालुक्यातील होळ येथे जलजीवन मिशन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याच्या मागणीसाठी पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांनी आजपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

होळ येथील पाण्याच्या फिल्टरसमोर सुरू असलेल्या या उपोषणात रखडलेली जलजीवन योजना सुरू करणे, नागरिकांना नळ कनेक्शन देणे, खोदलेले रस्ते दुरुस्त करणे आणि अपूर्ण पाईपलाईनचे काम पूर्ण करण्याची



मागणी करण्यात आली आहे.

उपोषणस्थळी भाजप युवा मोर्चाचे केज तालुका उपाध्यक्ष धनराज लाटे यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला असून उपोषण सोडविण्यासाठी प्रशासनाशी संपर्क साधला. जोपर्यंत मागण्यांची लेखी पूर्तता होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार उत्तरेश्वर शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

## डोक्यात वीट मारून महिलेची निर्घृण हत्या; चार आरोपींवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरानजीक असलेल्या चनई वडरवस्ती परिसरात केवळ मुलीला का मारले, असा जाब विचारल्याच्या कारणावरून एका ५० वर्षीय महिलेच्या डोक्यात विट फेकून मारून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या प्रकरणी राणी बालाजी राठोड (रा. चनई वडरवस्ती, किरमाणी दर्गाचे पाठीमागे, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीवरून एकाच कुटुंबातील चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सुभाष लष्करे, मंदाकिनी सुभाष लष्करे, विश्व सुभाष लष्करे आणि ईंद्र सुभाष लष्करे (सर्व राहणार चनई वडरवस्ती, किरमाणी दर्गाचे पाठीमागे, चनई, ता. अंबाजोगाई) यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी यांच्या मुलीला आरोपीने मारहाण केली होती. याचा जाब विचारण्यासाठी फिर्यादीची आई यशोदा बालाजी राठोड (वय ५० वर्षे) या गेल्या असता आरोपी सुभाष लष्करे याने शिवीगाळ करत त्यांच्यावर विट फेकून मारली. ही विट थेट यशोदा यांच्या डोक्यात लागल्याने त्या रक्तबंबाळ होऊन खाली पडल्या. भांडण सोडवण्यासाठी आलेले रोहन माणिक आडे आणि फिर्यादी राणी राठोड यांनाही आरोपीच्या मुलांनी काठीने बेदम मारहाण केली.गंभीर जखमी झालेल्या यशोदा राठोड यांना तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आरोपी सुभाष लष्करे, त्याची पत्नी मंदाकिनी सुभाष लष्करे, मुलगा विश्व सुभाष लष्करे आणि ईंद्र सुभाष लष्करे (सर्व रा. चनई वडरवस्ती, अंबाजोगाई) यांच्याविरुद्ध अंबाजोगाई ◀◀ पान ३ वर

### नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात बसून केली आरोपीच्या अटकेची मागणी

यशोदा राठोड यांच्या मृत्युनंतर त्यांच्या नातेवाईकांनी सर्व आरोपींच्या तत्काळ अटकेची मागणी करत बुधवारी सकाळी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात ठिय्या दिला. यामुळे पोलीस ठाण्यात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु, पोलीस निरिक्षक शरद जोगदंड यांनी लवकरात लवकर आरोपींच्या अटकेची ग्वाही दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## नगरपरिषद लिपीक शिवहर शेटे, विघ्नेश मुंडे, अक्षय धारक यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून फौजदारी कारवाई करून बडतर्फ करा-राकेश साळवे, सिद्धार्थ ससाने

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपरिषद ही एक ना अनेक कारणास्तव शहरवासीयांच्या चर्चेत असते. नगरपरिषदेमध्ये मालमत्तेच्या कागदपत्रांसाठी येथील कर्मचारी अनेक वेळेस कागदपत्र देण्यासाठी टाळाटाळ करतात. येथे येणाऱ्या नागरिकांशी येथील कर्मचारी उद्धटपणाची वागणूक देतात. एखाद्या कामासाठी वारंवार कार्यालयाची उंबरठे झिजवावे लागतात तर येथील कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत कधीही हजर नसतात जर कोणी कर्मचारी हजर असले तरीही मनमानी पणे वागतात असे नागरिकांतून बोलले जात असतानाच. माजलगाव नगर परिषदेतील लिपिक शेटे शिवहर चनबसआप्पा, विघ्नेश रत्नाकर मुंडे, व अक्षय अंकुश धारक यांनी बनावट कागदपत्रे, खोट्या स्वाक्षऱ्या, व अनियमिततेद्वारे केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून फौजदारी कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्याचेथनिवेदन पीपल्स रिपब्लिकन पार्टी तालुका अध्यक्ष राकेश साळवे तसेच सिद्धार्थ ससाणे यांनी उपविभागीय अधिकारी साहेब माजलगाव यांना दिले आहे.



याबाबत सविस्तर असे की, नगरपरिषद माजलगाव येथील लिपिक शेटे शिवहर चनबसआप्पा यांनी खालील गंभीर अनियमितता केल्याची तक्रार आहे. गुंठेवारी व मालमत्ता प्रकरणांमध्ये बनावट आदेश व कागदपत्रे तयार केली. तात्कालीन मुख्याधिकारी यांच्या नावाने बनावट (डुप्लिकेट) स्वाक्षऱ्या करून प्रमाणपत्र जारी केली. गुंठेवारी परवान्या मध्ये नावे क्षेत्रफळ व नोंदी मध्ये बेकायदेशीर फेरफार केला. रजिस्टर मधील नोंदी व जारी केलेल्या प्रमाणपत्रामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळते. या कामे शिवहर चनबसआप्पा शेट्टी , विघ्नेश रत्नाकर मुंडे व अक्षय अंकुश धारक यांनी संगणमत करून पीटीआर व गुंठेवारी, नामांतर, मालमत्ता रजिस्टर खतावणी व इतर ठिकाणी खाडाखोड केली. तसेच इतर प्रकरणात दिनांक व परवाना क्रमांकात विसंगती असून नियमबाह्य प्रमाणपत्रे दिली गेली आहे. संबंधित गैर व्यवहारामुळे शासनाची फसवणूक होऊन नागरिकांची दिशाभूल झालेली आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यावर फौजदारी कारवाई करावी, शासनाचे झालेले नुकसान वसूल करून संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई करावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कर्मचारी तात्काळ निलंबित करून कार्यातून दूर करण्यात यावे. असे निवेदन निवेदनकर्त्यांनी दिलेले असून संबंधित वरील अधिकारी, कर्मचाऱ्यावर फौजदारी कारवाई करून बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टी माजलगाव तालुका अध्यक्ष राकेश साळवे व सिद्धार्थ ससाने यांच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आलेले आहे. अन्यथा दि.२० जुलै २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता याची सर्वस्वी जबाबदारी ही आपल्या कार्यालयाची राहील.

## ना.पंकजाताई मुंडे यांनी केला विविध विकासकामांचा शुभारंभ, अतिक्रमन धारकांना केले पीटीआरचे वाटप

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगरपरिषद अनेक लोकोपयोगी आणि चांगले उपक्रम राबवित आहे. शहर स्वच्छ करण्यासाठी महिला बचत गटांच्या साहाय्याने सुरु असलेला उपक्रम अत्यंत चांगला, कौतुकास्पद आणि पर्यावरणपूरक आहे. लोकसहभागातून असे अनेक उपक्रम राबवून आपण शहराला स्वच्छ, सुंदर आणि प्रगत शहर अशी ओळख मिळवून देऊ. याकामी नागरिकांनी योगदान देऊन शहर विकासात योगदान द्यावे असे आवाहन करत 'वीज बिल मुक्त नगरपरिषद' अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केली.



गेवराई येथे नगरपरिषदे अंतर्गत होत असलेल्या विविध विकास कामांचा शुभारंभ आज ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाला.याप्रसंगी गेवराई शहरातील नागरिकांना पीटीआरचे वाटप देखील त्यांच्या हस्ते करण्यात आले. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, नगराध्यक्षा गीताभाभी पवार, बाळराजे पवार, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, युद्धाजित पंडित यांच्यासह सर्व नगरसेवक यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी नागरिकांशी संवाद साधताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की मी पालकमंत्री असताना गेवराई नगरपरिषदेला आणि मतदारसंघाला भरभरून निधी दिला. नगर परिषदेची इमारत, पाणीपुरवठा योजना, रस्ते, पायाभूत सुविधांसारखी विकास कामे आम्ही इथे केली. ग्रामीण भागात देखील अनेक कामे करता आली. महिला आणि बालविकास मंत्री असताना बचत गटांची चळवळ उभी केली,आज बचत गटांच्या महिलांचे शहर स्वच्छतेसाठी योगदान बघून आनंद वाटतो आहे.

घनकचरा प्रक्रियेच्या माध्यमातून नगरपरिषदेसाठी स्थायी उत्पन्न निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. येथील रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न देखील सोडवणार असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांना सांगितले. गेवराई शहरातील नागरिकांना विश्वास देताना ना. पंकजाताई म्हणाल्या गेवराईकरांच्या समस्या सोडविण्याची जवाबदारी माझी आहे, तुमच्या समस्या मार्गी लावताना दिलेल्या प्रत्येक आश्वासनाची पूर्तता करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## सरपंच आंधळेंनी दोन कुटुंबीयांच्या मदतीसाठी शासन दरबारी पाठपुरावा करून थेट मदतच मिळवून दिली

वडवणी । प्रतिनिधी

रुई ग्रामपंचायत अंतर्गत मागील वर्षी दोन घटना अत्यंत वेदनादायी व क्लेशदायक घडल्या होत्या. सारांश एक कुटुंब उघडे पडले तर दुसऱ्या कुटुंबातील चिमुकला जीवनाशी मुकला. या दुःखात दोन्हीही कुटुंबावर डोंगर कोसळला होता. परंतु अँड.मयूर आंधळे यांनी या कुटुंबांना मोलाचे सहकार्य केलेच तर या घटनेमध्ये कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी देखील शासन दरबारी पाठपुरावा स्वतः जातीने लक्ष घालून केला. या कुटुंबांना मदत मिळवून न्याय देण्यासाठी संचोटी ठेवली आणि अवघ्या दोन दिवसापूर्वीच या कुटुंबीयांना शासनाने आर्थिक मदत दिली. यावरून सरपंच



असावा तर अँड. मयूर आंधळे सारखाच याची प्रचिती या कामावरून ग्रामस्थांना आली आहे.

वडवणी तालुक्यातील मौजे रुई (पिंपळा) या गावात मागील वर्षी दोन वेदनादायी घटना घडल्या होत्या. यामध्ये भांगे परिवारातील युवा शेतकऱ्याने अल्पकर्ज घेतले होते. हे कर्ज कसे फेडू या हेतूने नैराश्य येत आत्महत्या केली होती. या कुटुंबाचा आधारवडच काळाच्या पडद्याआड गेल्याने कुटुंब देखील उघड्यावर पडले होते. आत्महत्या करणाऱ्या युवा शेतकऱ्यांच्या दोन मुलींचे लालन पोषनाची जबाबदारी अँड. मयूर आंधळे यांनी घेतली होती. इतकेच नाही तर मागील दिवाळीच्या सणाला आर्थिक मदत, सर्व दर्जेदार शालेय साहित्याची देखील मदत केली तर दुसरी घटना याच गावातील लोंढे परिवारात घडली. कुटुंबातील अकरा वर्षाचा चिमुकल्याचा शेतातील विजेच्या तारेला स्पर्श होऊन मृत्यू ची दुर्दैवी घटना घडली होती. या परिवारातील चिमुकला काळाच्या पडद्याआड गेल्याने परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. परंतु सरपंच अँड. मयूरभैया आंधळे यांनी माणुसकीचा धर्म निभावत या दोन्हीही घटना अत्यंत चोखपणे निभवल्या. या कुटुंबीयांना शासकीच्या आर्थिक मदतीचा हातभार देखील लागावा. या हेतूने शासन दरबारी सतत पाठपुरावा केला.घडलेल्या ◀◀ पान ३ वर

## सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

दिनांक १५ ७ २०२६ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणेचे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर व माननीय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांचे संयुक्त विद्यमाने बीड येथे तालुक्यातील नागरी ग्रामीण बिगरशेती, पगारदार, सेवक, सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, यांच्या करिता दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड मुख्य कार्यालय राजूरी वेस, बीड येथे दिनांक २१ ७ २०२६ ते २२ ७ २०२६ या कालावधीत केले आहे या दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गात मा. सतीश तोटावार साहेब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड. तसेच बी.जे. ठोंबरे साहेब सेवानिवृत्त प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर. एस. आर. कोळे साहेब उपप्राचार्य आदेशजी नहार साहेब सनदी लेखापाल दिगंबर कुंडलकर प्रमाणित लेखापरीक्षक हे या कार्यक्रमास मार्गदर्शन करणार आहेत तरी बीड तालुक्यातील नागरी, ग्रामीण, बिगरशेती, पगारदार, सेवक, सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, यांनी या दोन दिवशीय प्रशिक्षणास उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक तसेच लातूर प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य एस. आर. कोळे साहेब यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk